१०४ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, शनिवार ४ एप्रिल, २०२६ • वर्ष-५, अंक-१९५, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 195 Marathi - Daily - Pune, 4 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे हाल!
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# एकनाथ शिंदेंचे खरातला १७ कॉल! चाकणकर १७७ वेळा बोलल्या
# तटकरे, केसरकर, पाटील संपर्कात! दमानियांचा नवा स्फोट



**नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आज सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) दाखवून असा गौप्यस्फोट केला की, खरात आणि महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यात तब्बल १७७ कॉल झाले. तर खरात आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातही १७ वेळा बोलणे झाले. याशिवाय, भाजपाचे मंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे व शिंदे गटाचे माजी मंत्री दीपक केसरकर हेही वेळोवेळी भोंदू खरातच्या फोनवरून संपर्कात होते. ही माहिती एसआयटी प्रमुख तेजस्विनी सातपुते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिल्याचेही दमानिया यांनी सांगितले. त्यांच्या दाव्याने नवी खळबळ उडाली आहे.**

■ नाशिक

**चंदीगड** येथे एका लग्नाला गेलेल्या अंजली दमानिया यांनी आपला व्हिडिओ मीडियाला देत हा दावा केला. या व्हिडिओत त्यांनी म्हटले की, रुपाली चाकणकर म्हणायच्या की खरात माझे गुरू आहेत. त्यांच्याबद्दल मला विशेष काही माहिती नाही. आमचे केवळ कौटुंबिक संबंध होते. पण आत्ताच्या माहितीनुसार रुपाली चाकणकर यांनी एकूण १७७ कॉल अशोक खरातला केले आहेत. त्यांची बहीण प्रतिभा चाकणकर यांनीही २३६ कॉल केले आहेत. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खरात यांच्यातही १७ कॉल झाले. यामध्ये १० इनकमिंग आणि ७ आऊटगोइंग कॉल आहेत. यात सगळ्यात जास्त २१ मिनिटांचे संभाषण झाले. ही माहिती मी आधी संबंधित यंत्रणांना दिली आहे. पण मला वाटते की, ही माहिती जनतेलाही ठाऊक असली पाहिजे. राज्याचे उपमुख्यमंत्री अशा व्यक्तीशी संपर्कात असतील तर ते कशासाठी संपर्कात होते, याचे उत्तर त्यांनी दिले पाहिजे. चंद्रकांत पाटील आणि सुनील तटकरे यांचे प्रत्येकी ८ कॉल आहेत. आशिष शेलार यांचाही एक कॉल आहे. हे सगळे नॉर्मल कॉल आहेत. याच व्हॉट्सॲप पान ७ वर

### दमानिया यांची पोलिसांनी चौकशी करावी

आपल्याला सीडीआरची माहिती कुठून मिळाली याबद्दल बोलताना अंजली दमानिया म्हणाल्या की, कुठलाही विषय लढायला लागल्यावर बरीचशी माहिती माझ्यापर्यंत येते. तसाच काहीसा प्रकार आता झाला आहे. अशोक खरातचे जे प्रकरण महाराष्ट्रात चालू आहे, त्याची बरीचशी माहिती माझ्यापर्यंत येते. ती मी माध्यमांकडे देते. सीडीआरची कॉपी मला व्हॉटसॲपवर मिळाली. ज्यांनी पाठवली त्यांना मी ओळखत नाही. दमानियांचे हे विधान अत्यंत बेजबाबदारपणाचे आहे. व्हॉटसॲपवर अनोळखी माणसाने सीडीआरची माहिती पाठवली आणि ती त्यांनी शहानिशा न करता लोकांसमोर दिली, असे त्या कसे म्हणू शकतात? सीडीआरची माहिती ही पोलिसांनाच अधिकृतपणे मिळवता येते. यासाठी तपास यंत्रणांची परवानगी घेऊन, मोबाईल सेवा देणाऱ्या कंपनीकडूनच ती मिळवता येते. तरीही दमानिया ही माहिती अनोळखी व्यक्तीने पुरवली, असे बेधडक सांगतात. यामुळे त्यांना गृह खात्यातीलच कुणीतरी ही माहिती पुरवली का, अशीही चर्चाही होत आहे. दमानिया यांना ही माहिती कुणी पुरवली, त्या व्यक्तीचे नाव त्यांनी सांगायलाच पाहिजे. जर नाव माहीत नसताना, सीडीआर खरा की खोटा याची शहानिशा न करता दमानिया यांनी हे आरोप केले असतील तर त्या चंदीगड येथून आल्या की पोलिसांनी त्यांना ताबडतोब ताब्यात घेऊन त्यांची पूर्ण चौकशी केली पाहिजे.

## अमेरिकेच्या लष्करप्रमुखाची तडकाफडकी हकालपट्टी



**इराणविरुद्धच्या युद्धात हवे तसे यश मिळत नसल्याने संतापलेले राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी लष्करातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची हकालपट्टी करण्याचा धडाका लावला आहे. जनरल डेव्हिड होडने आणि मेजर जनरल विल्यम ग्रीन यांच्यानंतर लष्करप्रमुख रँडी जॉर्ज यांना तत्काळ निवृत्ती स्वीकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**

■ वॉशिंग्टन

रँडी जॉर्ज यांना पदावरून पायउतार होण्याचे निर्देश हेगसेथ यांनी दिले. इराणविरुद्धच्या युद्धात हेगसेथ आणि ट्रम्प यांच्या मनासारखे निर्णय घेणारा दुसरा एखादा अधिकारी रँडी जॉर्ज यांच्या जागी नेमण्याचा हेगसेथ यांचा विचार आहे. अमेरिकेत लष्करप्रमुखाची नियुक्ती चार वर्षांसाठी केली जाते. रँडी जॉर्ज यांची नियुक्ती माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांच्या काळात २०२३ मध्ये झाली होती. म्हणजेच त्यांचा कार्यकाळ २०२७ पर्यंत होता. मात्र हेगसेथ यांनी त्यांना तत्काळ निवृत्ती घेण्याचे निर्देश देऊन त्यांना पदावरून दूर होण्यास भाग पाडले.

याआधी जनरल डेव्हिड होडने आणि मेजर जनरल विल्यम ग्रीन यांची ट्रम्प प्रशासनाने हकालपट्टी केली होती. होडने हे लष्कराच्या प्रशिक्षण विभागाचे प्रमुख होते.तर मेजर जनरल ग्रीन हे लष्कराच्या चॅपलिन कॉर्प्सचे प्रमुख होते.

याशिवाय देशाची केंद्रीय तपास संस्था असलेल्या एफबीआयचे संचालक काश पटेल, लष्कर सचिव डॅनियल ड्रिसकोल आणि कामगार मंत्री लॉरी चावेज-डिरेमर हे उच्चपदस्थ अधिकारी ट्रम्प आणि हेगसेथ यांच्या रडारवर आहेत, त्यांची कधीही उचलबांगडी केली जाऊ शकते, अशी चर्चा आहे.

## थोडक्यात...

### नागपुरात नवीन विधानभवन एक हजार कोटी मंजूर

**मुंबई** - राज्य सरकारने नागपूरमध्ये नवीन विधानभवन संकुलाच्या उभारणीसाठी १,००० कोटी रुपये मंजूर केले आहेत. मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा विकास समितीने ११ मार्च रोजी या प्रकल्पाला हिरवा कंदील दिला होता. त्यानंतर मुंबईत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे संकुल २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. सध्याच्या विधानभवनाच्या इमारत कायदेविषयक गरजांसाठी जागा अपुरी पडत असल्याने नवीन अत्याधुनिक संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुख्य इमारतीत चार मजल्यांवर ए, बी आणि सी ब्लॉक असून तिचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ ६२,९२४ चौरस फूट आहे. नवीन संकुल सध्याच्या १९२० सालच्या ब्रिटिशकालीन विधानभवन परिसरातील दोन भूखंडांवर जागा घेणार आहे. भूखंड क्रमांक १ वरील मुख्य इमारतीसाठी ६६२.८९ कोटी रुपये (जीएसटीसह) मंजूर करण्यात आले आहेत.

### मलेशियामध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम



**क्वालालंपूर** - मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या इंधन टंचाईचा सामना करण्यासाठी मलेशिया सरकारने सर्व सरकारी कर्मचाऱ्यांसाठी कार्यालयात न येता घरून कामे करणे (वर्क फ्रॉम होम) बंधनकारक करण्याचे धोरण स्वीकारले आहे. येत्या १५ एप्रिलपासून हे धोरण लागू होणार आहे. मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी यासंबंधीची घोषणा केली आहे. या धोरणानुसार सर्व मंत्रालयीन कर्मचारी, सरकारच्या सर्व आस्थापनांमधील कर्मचारी, राज्य सरकारशी संबंधित असलेल्या सर्व कंपन्यांमधील कर्मचारी या सर्वांना घरी बसूनच कार्यालयीन काम करावे लागणार आहे.

### ट्रूकॉलरचा वापरकर्त्यांचा ५० कोटींचा टप्पा पार

**मुंबई**- ट्रूकॉलर ५०० दशलक्ष (५००मिलियन) म्हणजेच ५० कोटींपेक्षा जास्त सक्रिय वापरकर्त्यांचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे. हे लोकप्रिय कॉलर आयडी आणि स्पॅम शोध ॲप सुरक्षित संवादासाठी जागतिक स्तरावर एक प्रमुख व्यासपीठ बनले आहे, यामध्ये भारत ही जगभरात सर्वात मोठी बाजारपेठ आहे. ३१ मार्च रोजी कंपनीने

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

५०० दशलक्ष वापरकर्त्यांचा टप्पा ओलांडल्याची घोषणा केलीत् या ५०० दशलक्ष वापरकर्त्यांपैकी मोठा वाटा भारतातून आहे, जो या प्लॅटफॉर्मचा मुख्य भाग आहे. भारतात ट्रूकॉलर वापरकर्त्यांची संख्या ३५० दशलक्ष इतकी झाली आहे. हे प दररोज अनाहूत कॉल, स्पॅम आणि अवांछित कॉल्स ओळखून वापरकर्त्यांचे संरक्षण करते. कॉलर आयडी, स्पॅम ब्लॉकिंग, व्हॉइस कॉल लाँचर आणि मेसेजिंग यांसारख्या सेवांमुळे याची लोकप्रियता वाढली आहे. हे ॲप जगभरातील वापरकर्त्यांना सुरक्षित आणि विश्वासार्ह संप्रेषण अनुभव देण्यासाठी ओळखले जाते.

## ट्रम्प यांचा आणखी एक धक्का औषधांवर १०० टक्के टॅरिफ

■ वॉशिंग्टन

**जगभरातून** अमेरिकेत आयात होणाऱ्या मालावर भरमसाठ टॅरिफ (आयात शुल्क) संपूर्ण जगाला वेठीस धरणारे अमेरिकेचे



राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा दणका दिला आहे. अमेरिकेत जगभरातून आयात होणाऱ्या सर्व पेटंट असलेल्या औषधांवर ट्रम्प यांनी शंभर टक्के टॅरिफ लागू केले आहे. ट्रम्प यांनी काही देशांना शंभर टक्के आयात शुल्कामधून दिलासा दिला आहे. मात्र, त्यात भारताचे नाव नाही.

ट्रम्प प्रशासनाने जारी केलेल्या नव्या आदेशात देशाबाहेर बनवलेल्या पेटंट असलेल्या औषधांवर शंभर टक्के टॅरिफ लागणार आहे. औषध कंपन्यांना आपल्या औषधांची निर्मिती अमेरिकेत करायला प्रोत्साहन देण्याचा अमेरिकेचा प्रयत्न या आदेशामागे आहे. कंपन्यांना या शंभर टक्के टॅरिफमध्ये काही प्रमाणात किंवा पूर्ण सवलत पान ७ वर

## आसामचे मुख्यमंत्री सर्वांत भ्रष्ट राहुल गांधी यांचा गंभीर आरोप



■ बोकाजन

**आसामचे** मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा हे देशातील सर्वांत भ्रष्ट मुख्यमंत्री आहेत.ते पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह आसाममध्ये 'जमीन एटीएम' चालवतात, असा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काल गुरुवारी केला. आसाम विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येथे आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते काँग्रेसचा निवडणुक जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला.

यावेळी राहुल गांधी म्हणाले की, आसाममधील जवळपास ६१ हजार एकर जमीन तीन मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या घशात घालण्यात आली आहे. नरेंद्र मोदी, अमित शहा आणि हिमंत बिस्वा सरमा यांनी आसामला जमिनीचे एटीएम बनवले आहे. जनतेकडून जमीन हिसकावून ती उद्योगपतींना वाटली जात आहे. भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे सरमा हे पूर्णपणे मोदींच्या नियंत्रणाखाली असून ते सिंडिकेटद्वारे राज्य चालवत आहेत. यावेळी राहुल गांधी हे गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये सिंगापूर येथे बुडून मृत्यू झालेले प्रसिद्ध गायक जुबीन गर्ग यांचा उल्लेख करताना भावुक झाले. ते म्हणाले, जुबीन गर्ग हे आसामच्या बहुसांस्कृतिक अस्मितेचे प्रतिक होते. काँग्रेस सत्तेवर आल्यास १०० दिवसांच्या आत त्यांच्या मृत्यूचा तपास करून त्याच्या कुटुंबाला न्याय दिला जाईल, याची मी १०० टक्के खात्री देतो.

## खासदार संख्या वाढविण्यासाठी १६ एप्रिलपासून विशेष अधिवेशन

■ मुंबई

**महिला** आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी आणि लोकसभेतील खासदारांची संख्या जागा ५४३ वरून ८१६ पर्यंत वाढवण्याच्या उद्देशाने मोदी सरकारने १६ एप्रिलपासून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे.१६ ते १८ एप्रिल असे तीन दिवस हे अधिवेशन चालणार आहे.

संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी काल राज्यसभेत बोलताना या आगामी अधिवेशन सत्राचे संकेत दिले होते.काल गुरुवारी अनिश्चित काळासाठी तहकूब केले होणार होते.मात्र,आता प्रस्तावित विधेयकासाठी



हे विशेष सत्र बोलावण्यात आले आहे. काही महत्त्वाची विधेयके आणि मुद्यांवर विचारविनिमय करण्यासाठी सभागृह लवकरच पुन्हा भरेल. आगामी दोन-तीन आठवड्यांत आम्ही एक अत्यंत महत्त्वाचे विधेयक मांडणार आहोत, ज्याची कल्पना आम्ही विरोधी पक्षांनाही दिली आहे,असे रिजिजू यांनी म्हटले आहे.या ३ दिवसीय सत्रात महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित करण्यावर चर्चा होणार आहे. या बदलामुळे लोकसभेत महिला खासदारांची संख्या २७३ पर्यंत पोहोचू शकते. वाढीव जागांसाठी परिसीमन प्रक्रियेत बदल करणारी घटनादुरुस्तीही आणली जाऊ शकते.

## म्हाडा ९६ अतिधोकादायक इमारती रिकाम्या करणार

■ मुंबई

**म्हाडाच्या** मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने गेल्या वर्षी केलेल्या सर्वेक्षणात ९६ इमारती अतिधोकादायक घोषित केल्या होत्या. अनेक नोटिसा देऊनही या इमारतींमधील सुमारे २४०० कुटुंबे अजूनही तिथेच वास्तव्यास असल्याने म्हाडा आता या इमारती सक्तीने रिकाम्या करण्याचा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. मुंबईत सध्या १३ हजारांहून अधिक उपकरप्राप्त इमारती असून त्यापैकी अनेक ८० ते १०० वर्षे जुन्या आहेत. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या इमारती कोसळून जीवित किंवा वित्तहानी होऊ नये यासाठी दरवर्षी सर्वेक्षण करून धोकादायक इमारतींची यादी जाहीर केली जाते. गेल्या वर्षीच्या पावसाळ्यापूर्वीच्या सर्वेक्षणात ९६ इमारती अतिधोकादायक असल्याचे घोषित करण्यात आले होते. म्हाडाने रहिवाशांना घरे रिकामी करण्यासाठी दरमहा २० हजार रुपयांचे भाडे देण्याचा पर्याय दिला होता. तसेच, संबंधित रहिवाशांनी वॉर्ड कार्यालयात आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहनही करण्यात आले होते.

## बारामतीत काँग्रेस उमेदवार देणार संजय राऊत मात्र भूमिकेवर नाराज

■ मुंबई

**बारामती** आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात पुन्हा एकदा राजकीय घडामोडी सुरु झाल्या आहेत. काँग्रेसने बारामतीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार उभा करण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला आहे. यावर उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी ज्या मतदारसंघात ज्या पक्षाची ताकद आहे तिथे त्याच पक्षाने लढावे, असे सूचक भाष्य करत काँग्रेसचे कान टोचले आहे. यामुळे मविआत तिढा असल्याची चर्चा रंगली. या दोन्ही मतदारसंघांमध्ये काँग्रेस निवडणूक लढवण्यास काँग्रेस हायकमांडने हिरवा कंदील दाखवला आहे. त्यामुळे आता उमेदवार निवडीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. बारामतीसाठी इच्छुकांच्या मुलाखती पार पडल्या असून स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. राहुरीतही उमेदवार निश्चितीची प्रक्रिया वेगाने सुरू असून लवकरच अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. अंतिम नावांवर शिक्कामोर्तब करण्यापूर्वी मित्रपक्षांशी चर्चा केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पान ७ वर

## हत्येच्या प्रयत्नाच्या प्रकरणातून खोक्या भोसले निर्दोष मुक्त

■ बीड

**आष्टीचे** आमदार सुरेश धस यांचा समर्थक सतीश उर्फ खोक्या भोसले याला हत्येच्या प्रयत्नाच्या प्रकरणात बीड जिल्हा न्यायालयाने निर्दोष ठरवत मोठा दिलासा दिला आहे. जवळपास एक वर्ष कारागृहात राहिल्यानंतर त्याची सुटका झाली असून त्याच्या सुटकेची व्हिडीओ व्हायरल झाली आहे.

वर्षभरापूर्वी भोसले याच्यावर ढाकणे पिता-पुत्रावर हल्ला करून खून करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात पोलिसांनी त्याला अटक करून छत्रपती संभाजीनगर येथील कारागृहात ठेवले होते. दीर्घ सुनावणीनंतर न्यायालयाने सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे त्याला निर्दोष मुक्त केले. निकालानंतर त्याची अधिकृत सुटका झाली असून तो कारागृहाबाहेर आला आहे.

भोसले याच्याशी संबंधित आणखी एक प्रकरणही चर्चेत आहे. एका व्यक्तीला बॅटने मारहाण केल्याचा त्याचा व्हिडिओ काही काळापूर्वी व्हायरल झाला होता.

## पुणे जिल्हा परिषदेत सुनेत्रा पवारांकडून हर्षवर्धन पाटलांच्या कन्येला संधी



**पुणे जिल्हा परिषदेत विषय समित्यांच्या सभापतीपदांच्या नियुक्त्यांमुळे राजकीय घडामोडींना वेग आला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केलेल्या पदवाटपामुळे नवे समीकरण तयार झाले. या पदवाटपात माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची कन्या अंकिता पाटील यांना संधी मिळाल्याने जोरदार चर्चा रंगली आहे.**

■ पुणे

**इंदापूर** तालुक्यातील अंकिता पाटील-ठाकरे यांची महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी नियुक्ती झाली. याशिवाय हवेली तालुक्यातील जितेंद्र बडेकर यांना समाजकल्याण समितीचे सभापतीपद मिळाले, तर वेल्हे तालुक्यातील अमोल नलावडे यांच्याकडे बांधकाम व आरोग्य समितीची जबाबदारी सोपवली आहे. मावळ तालुक्यातील दीपाली हुलावळे यांची कृषी समितीच्या सभापतीपदी निवड झाली. या सर्व नियुक्त्यांचे अधिकार सुनेत्रा पवार यांना दिले होते. विविध तालुक्यांमधील राजकीय संतुलन साधत आणि स्थानिक समीकरणांचा विचार करत ही पदवाटपाची प्रक्रिया पार पडल्याचे पक्षाने सांगितले. या नव्या सभापतींचा कार्यकाळ सव्वा वर्षांचा असणार आहे. यापूर्वी राष्ट्रवादी पान ७ वर

## खरातकडे स्वेच्छेने जाणाऱ्या महिलांवरही कारवाई करा

■ मुंबई

### अरुणा सबानेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**नाशिकचा** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात एक वेगळीच मागणी पुढे आली आहे.भोंदूगिरी करून महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या खरातवर कारवाई कराच, पण त्याचवेळी त्याच्या लैंगिक सुखासाठी स्वेच्छेने जाणाऱ्या महिलांवरही कठोर कारवाई करा,अशी मागणी लेखिका अरुणा सबाने यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

खरातचे जे व्हिडिओ समाज माध्यमांवर फिरत आहेत त्यापैकी बऱ्याच व्हिडिओंमध्ये महिला स्वखुशीने त्याच्याशी लैंगिक चाळे करताना दिसतात.त्यांना गुंगीचे औषध दिले गेले आहे किंवा त्यांच्या खरात बळजबरी करत आहे असे कुठेच दिसत नाही. त्या महिलांच्या चेहऱ्यांवर हसू आहे.याचा अर्थ त्या महिला स्वेच्छेने आपली लैंगिक भूक भागवण्यासाठी खरातकडे जात होत्या.

या महिला शिक्षित आणि विवाहित आहे. त्यांनी हा व्यभिचार केला आहे.त्यामुळे त्यांना पीडित स्त्रिया न मानता खरातला गुन्ह्यात साथ देणाऱ्या सहआरोपी करा, आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करा.

# असा असतो खलाशी

चला आज थोडं माझ्या या जगातील सर्वात मोठ्या आणि विशेष जहाजाविषयी जाणून घेऊया.

एमव्ही पॅसिफिक ब्रिझ. जगातील सर्वात मोठे गॅसवाहक जहाज. हो अगदी बरोबर वाचत आहात.... हे जगातील सर्वात मोठं असं गॅसवाहक जहाज आहे. जहाजाची मोजमापं जर लक्षात घेतलीत तर हे किती अफाट आहे ते लक्षात येईल, ही सगळी मापे मीटरमध्ये आहेत. (यातील प्रत्येक मापाला ३ ने गुणलात की ही मापं फुटात होतील)

- जहाजाची लांबी : २९९ मीटर
- जहाजाची रुंदी : ५२ मीटर
- जहाजाची उंची : एकूण ६५ मीटर
- जहाजाची खोली : पाण्याच्या आत २८ मीटर
- एकूण मजले: १४ मजले (लिफ्ट आहे)
- एकूण- ऑफिसर : १३
- एकूण कामगार : २२
- इंजिन पॉवर : २९,६०० किलो वॉट (जवळपास ३० मेगा वॉट)
- विद्युत जनरेटर : ८,००० किलो वॉटची पाच इंजिन (एकूण पावर क्षमता ४० मेगा वॉट)
- वेग (कमाल) : ३६३६

ऑफिसरमध्ये आम्ही सगळे १३ जण भारतीय आहोत, तर बाकीचे सर्व कामगार फिलिपिनो आहेत.

माझं जहाज हे एक नैसर्गिक वायू (Natural Gas) वहन करणारे जहाज आहे. ज्याला सर्वजण CNG म्हणून ओळखतात तोच हा Natural Gas. त्याला वायू रूपामध्ये एक विशिष्ठ दाब ठेवून साठवले जाते त्यालाच आपण Compressed Natural Gas (CNG) म्हणतो. हा नैसर्गिक वायू आम्ही द्रव रुपात ऑस्ट्रेलियाहून तैवान या देशात पोचवत असतो, दर महिन्यात किमान २ ट्रिप आम्ही तैवानला येतोच येतो.

आमच्या जहाजाची एक वेळी गॅस वहन करण्याची क्षमता.

१ मीटर उंची x १ मीटर रुंदी x ११मीटर लांबी = याला १ घनमीटर म्हणतात हे आपणास माहीत आहेच, या एक घनमीटरमध्ये १,००० लिटर पाणी सामावते. या एक घनमीटर टन (एक मेट्रिक टन लोड) पाणी म्हणतात. आम्ही गॅस आणतो तो घनमीटर टन मध्ये मोजला जातो. कारण तो द्रव रुपात असतो आणि आम्ही एका वेळी १, ८२,००० मेट्रिक टन होय. एक लाख ब्याऐंशी हजार घनमीटर टन (१,८२००० ला १,००० ने गुणल्यास जो अंक येईल तितके लिटर) गॅस आम्ही एकावेळी वहन करतो. जहाजातून नॅचरल गॅस वहन करण्यासाठी दोन प्रकारच्या टाक्या वर्षानुवर्षे प्रचलित आहेत. मेम्बरेन टँक आणि मॉस टँक. मेम्बरेन टँक हे चौकोनी आकाराचे असतात. एका जहाजात ४ ते ५५ टँक असतात. यात




**मी बापा म्हणजेच बाळासाहेब पाटोळे, एक अस्सल कोल्हापुरी जहाजी विद्युत अभियंता (इलेक्ट्रो टेक्नो ऑफिसर). गेली २९ वर्षे जहाजात काम करतोय.**

टँकमध्ये गॅस भरल्यानंतर वरती अगदी किंचितशी रिकामी जागा शिल्लक राहते त्याचे क्षेत्रफळ टाकीच्या लांबी रुंदीच्या प्रमाणात असते त्यामुळे गॅसचा वरील भाग जास्ती प्रमाणात मोकळा (रिकामा) राहतो आणि त्यामुळे जास्ती प्रमाणात गॅस हा द्रवरूपातुन वायुरूपात आपोआप (जहाज हलल्यामुळे किंवा तापमानातील किंचितसा फरक यामुळे) परावर्तित होतो आणि याचं नियंत्रण प्रमाण हे ०.१५ टक्के इतकं असते. (उदाहरण म्हणाल तर पसरत भांड्यात पाणी तापवले तर वर असणारे पसरट क्षेत्रातील पाणी भरपूर प्रमाणात वाफ होऊन लवकर निघून जाते) मॉस टँक म्हणजे अगदी बॉल सदृश्य गोलाकार टाकी. असा हा बॉल जर गॅस ने पूर्ण भरत आणला तर अगदी टोकावर गॅस भरून रिकामी राहिलेली जागा ही अगदी कमी क्षेत्रफळाची शिल्लक राहाते आणि ही जागा आहे कमी असल्याने जहाज हलताना ही त्या द्रवरूपी गॅसचे वायुरूपात परावर्तन अगदी नगण्य म्हणजे ०.०८ टक्के इतके कमी होते, म्हणजेच मेब्रेन टँक पेक्षा निम्म्याने कमी. आमच्या जहाजात अश्या ४० मीटर (१२० फूट) रुंद असलेल्या चार टाक्या आहेत आणि प्रत्येक टाकीत सरासरी ४५,००० मेट्रिक टन गॅस सामावतो आणि असे मॉस टँक असणारे व १,८२,००० मेट्रिक टन गॅस वहन करणारे आमचे जहाज पृथ्वीवरएकमेव आहे आणि हे जहाज आम्ही भारतीय ऑफिसर अगदी सराईतपणे आणि सुरक्षितरीत्या चालवत आहोत आणि त्यात मी एकमेव विद्युत अभियंता आहे हीच खरी अभिमानाची गोष्ट आहे.

आता बघू दुसरे आश्चर्य, हा नैसर्गिक वायू पृथ्वीच्या पोटातून काढला जातो तेंव्हा तो वायू रुपात असतो आणि तो वायू रूपातच ठेवला आणि वहन करायचं म्हटलं तर त्याला प्रचंड मोठी जागा लागणार म्हणून याला द्रव रुपात परावर्तित करावा लागतो आणि त्यासाठी त्याचे तापमान शून्याच्या खाली म्हणजेच वजा १६३ डिग्री सेल्सिअस इतकं उतरावे लागते म्हणजे तो गॅस द्रावरूपात परावर्तित करून आम्हाला आमच्या जहाजात नेता येतो, हे गॅस थंड करण्याचे एकमेव कारण म्हणजे ६०० लिटर गॅस जेंव्हा -१६३ डिगरीवर थंड केला जातो त्यावेळी तो फक्त १ लिटर द्रव इतकाच होतो.

म्हणजेच १ लिटर द्रव गॅसचा वायू बनवला तर तो ६०० लिटर गॅस होतो, याच हिशोबाने पाण्याचं सुद्धा गणित असेच मोठे आहे, तुम्ही जर एक लिटर पाण्याची वाफ केलीत आणि न दाब देता ती वाफ एका एका लिटरच्या कॅन मध्ये भरायला चालू केलेत तर तुम्हाला एकूण १,४०० कॅन लागतील, म्हणजेच एक लिटर पाण्यापासून १,४०० लिटर वाफ तयार होते .

मग लक्षात घ्या हे तापमान कमी करणे किती गरजेचे आहे, आणि हेच तापमान आम्हाला कायम ठेवावे लागते नाहीतर गॅस वाढत जाऊन इतका प्रचंड दाब तयार होईल की टाकीसहित जहाजाचा स्फोट होऊ शकतो, म्हणून आमचं महत्वाचं काम ते हेच असतं की गॅस चे तापमान वजा १६३ हे राहीलच पाहिजे आणि टँकचे प्रेशर ही फक्त २५ Kpa च्या आताच राहिले पाहिजे.

जगात सगळ्यात धोकादायक नोकरी म्हणून एक नंबर लागतो बॉम्ब निकामी करणाऱ्यांचा आणि दुसरा नंबर लागतो आम्हा गॅस वाहतूक करणाऱ्या जहाजी लोकांचा. जेव्हा जहाजात गॅस द्रव रुपात भरला जातो त्यावेळी ज्या पाईपमधून गॅस जहाजात भरला जातो त्या पाईप मधील तापमानातील तफावत व घर्षण यामुळे त्या गॅसचा कांही भाग वायू मध्ये परावर्तित होतो, तो गॅस परत आम्ही गॅस भरणाऱ्या पोर्टकडे दुसऱ्या पाईप मधून पाठवतो. हा गॅस पुन्हा द्रव रुपात परावर्तित केला जातो आणि साठवला जातो. तर कधी कधी अतिरिक्त गॅस हा जाळलाही जातो.

आता थोडं आम्हा जहाजी लोकांच्या दिनचर्येबद्दल. आम्ही ऑफिसर इथं जहाजात कामावर तीन महिने आणि घरी सुट्टीवर तीन महिने असे चक्र चालू असते, आणि कामगार जहाजात ६ महिने आणि घरी ३ महिने असतात. आम्ही सर्वजण सकाळी ८ ते सायंकाळी ५५ पर्यंत काम करतो, रोज न चुकता. आठवड्यात एखादी सुट्टी असते. सुट्टीच्या दिवशी मग इच्छा असेल तर आमचं आवडतं कोल्हापुरी जेवण बनवतो, कधी गाणी म्हणतो, कधी स्केचिंग करतो. या नोकरीमुळे स्वतः वर भरपूर लक्ष देता येतं, छंद जोपासता येतात. आणि हो, आपणा साठी पोस्ट ही लिहित असतो.

रोज सायंकाळी ५ ते दुसऱ्या दिवशी सकाळी साडे सात पर्यंत आम्ही रिकामे असतो, जर या काळात कांही मशीन बिघाड झालाच तर मग मात्र रात्र दिवस असं कांही बघून चालत नाही, कारण जहाज हे चालूच राहावे लागते आणि त्याचसाठी तर आम्ही जहाजात असतो.

रोजचा दिनक्रम : सकाळी ७.३० ला नास्ता, १० वाजता चहा ब्रेक,१२ वाजता जेवण, ३ वाजता दुपारचा चहा ब्रेक आणि सायंकाळी ६ वाजता रात्रीच जेवण हा आमचा दिनक्रम. जेवण बनवायला प्रशिक्षित असे दोन कुक असतात, आणि इतर दोन जण जेवण वाढणे, प्लेट साफ करणे व आमच्या रूम साफ करणे यासाठी असतात

मनोरंजन म्हणून दोन सुसज्ज अश्या tv रूम, त्यात सर्व अद्यावत म्युजिक सिस्टम , प्रोजेक्टर , LED tv आहेत, मसाज खुर्च्या आहेत.

जहाजात सॅटेलाईट वरून इंटरनेट चालू असते, सगळीकडे WiFi लावले आहेत, पण दर दिवसाला प्रत्येकी जीबी इतका डेटा आठ तासंकरिता दिला जातो,यात घरच्यांशी बोलणं आणि तुमच्यासाठी पोस्ट पाठवणं हे काम आरामात होऊन जाते. इथं सोबतीला नाहीत म्हणजे फक्त घरचे आणि तुमच्या सारखे मित्र मंडळी आणि हेच एक मोठं आव्हान आणि नाईलाज असणारे दुःख आहे.

काय म्हणता मग, वाचून कळलं का ?

आमची नोकरी म्हणजे नुसती मजा नाहीय, आम्ही २४ तास बॉम्ब वरती बसून असतो, आणि म्हणूनच आम्हाला या सोयी दिल्यात, नाही का?

प्रत्येकाला आम्ही घरी असताना वापरणारे भारी भारी कपडे , गाड्या दिसतात पण वर्षातले सहा महिने बॉम्ब वर बसून घरच्यांसाठी तळमळत असतो हे मात्र कोणाला कधी दिसले नाही आणि दिसणार ही नाही.



## घारापुरी बेटावर सापडलेला प्राचीन जलकुंभ आयताकृती

■ उरण

**जागतिक** वारसा स्थळ असलेल्या एलिफंटा अर्थात घारापुरी बेटावर सध्या उत्खनन सुरू आहे. मोराबंदर परिसरात पुरातत्त्व विभागाद्वारे सुरू असलेल्या या उत्खननात सुमारे १५०० वर्षांपूर्वीचे दगड- विटांनी बांधलेले एक भव्य 'टी' आकाराचे जलकुंड सापडले आहे. यामुळे प्राचीन काळातील प्रगत अभियांत्रिकी आणि जलव्यवस्थापन प्रणालीवर प्रकाश पडला आहे.

हे जलकुंड बेटावरील रहिवाशांना वर्षभर पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अधीक्षक पुरातत्त्व शास्त्रज्ञ डॉ. अभिजित आंबेकर यांच्या नेतृत्वाखाली हे संशोधन सुरू आहे. आंबेकर यांनी या सापडलेल्या जलकुंडाबाबत सांगितले की, हे जलकुंड आयताकृती असून एका बाजूला काटकोनी पायऱ्यांच्या जोडणीमुळे त्याला 'टी' आकार प्राप्त झाला आहे. याची लांबी सुमारे १४.७ मीटर असून रुंदी १०.८ मीटर आहे. आतापर्यंत ५ मीटर खोलीपर्यंत उत्खनन झाले असून, त्यात २० पायऱ्या उघडकीस आल्या आहेत.या पायऱ्यांसाठी वापरलेले दगड बेटावरील नसून ते बाहेरून आणलेले आहेत. ही पायऱ्यांची विहीर राजस्थान, गुजरात शैलीची आहे.

## मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध गायक विनय मांडके यांचे निधन



■ मुंबई

**सात** हजारांहून अधिक जिंगल्स आणि दीडशेहून अधिक मराठी चित्रपटांसाठी पार्श्वगायन करणारे प्रसिद्ध मराठमोळे गायक विनय मांडके यांचे बुधवारी अल्पशः आजाराने दादर येथील घरी निधन झाले. ते ७३ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. विनय मांडके यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून आणि नातू असा परिवार आहे. त्यांनी अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या जवळपास प्रत्येक चित्रपटासाठी पार्श्वगायन केले. 'लक्ष्याचा आवाज' अशी त्यांची ओळख होती, तर 'हमारा बजाज' सारख्या लोकप्रिय जिंगल्समुळे ते घराघरांत पोहोचले होते. हमाल दे धमाल, दोन रुपये दे गं मला आणि ही दोस्ती तुटायची नाय या गाण्यांसाठीही त्यांनी आवाज दिला होता. किशोरकुमार यांची गाणी गाण्यात ते निपुण होते. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वात शोककळा पसरली आहे. ऑर्केस्ट्राच्या माध्यमातूनही त्यांनी संगीत रसिकांना निखळ आनंद दिला.

## मुंबईत नवीन बांधकामाच्या पाहणीसाठी 'बॉडी कॅमेरा'

**पालिका प्रशासनाची नवीन नियमावली**

■ मुंबई

**मुंबई** महापालिका प्रशासनाने आता नवीन बांधकामाच्या ठिकाणाची पाहणी करण्यासाठी बॉडी कॅमेऱ्यांचा वापर अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. पालिकेच्या या निर्णयामुळे बांधकाम ठिकाणी प्रत्यक्षात अंमलबजावणी होते की नाही,याची खरीखुरी माहिती मिळणार आहे. शहरातील वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी पालिकेने नियमावली जारी केली आहे.

पालिका मुख्यालयात गुरुवारी महापालिका



उच्चस्तरीय समिती, वॉर्ड अधिकारी आणि विभागाच्या पर्यावरण अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांनी बांधकाम स्थळांमधून आणि रस्त्यांवरील धुळीमुळे होणारे प्रदूषण नियंत्रणात आणण्याचे निर्देश दिले. त्यानुसार आता २६ वॉर्डमध्ये प्रत्येकी एक बॉडी कॅमेरा पालिकेच्या पथकातील कर्मचाऱ्यांना देण्यात आला आहे. प्रायोगिक तत्त्वावर याची अंमलबजावणी केली जात आहे. आता अधिक कठोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले असल्याचे सांगितले जात आहे.

## बेस्ट ई-बस चालकांना प्रशिक्षणाचा अभाव समर्थनीय ठरू शकत नाही

**हायकोर्टाची टिप्पणी**

■ मुंबई

**मुंबईसारख्या** गजबजलेल्या रस्त्यांवर प्रवासी वाहून नेणाऱ्या बस चालवण्यापूर्वी चालकांना पुरेसे प्रशिक्षण न देणे अजिबात योग्य ठरू शकत नाही, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने २०२४ मधील कुर्ला बस अपघातातील बेस्ट चालकाला जामीन मंजूर करताना नोंदवले. या दुर्घटनेत नऊ जणांचा मृत्यू झाला होता आणि अनेक जखमी झाले होते. ही ठोस प्राथमिक निरीक्षणे काल उपलब्ध झालेल्या सविस्तर आदेशात नोंदवण्यात आली ३० मार्च रोजी आरोपी संजय मोरे याला जामीन मंजूर करताना न्या. आर. एम. जोशी यांनी ई-बस चालवणाऱ्या चालकांना योग्य प्रशिक्षण न दिल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. आरोपपत्राच्या प्राथमिक पाहणीत न्यायालयाने नमूद केले की, बेस्टला करारानुसार चालकांना किमान सात दिवसांचे प्रशिक्षण देणे बंधनकारक होते. मात्र, प्रशिक्षण कालावधी फक्त तीन दिवसांवर आणण्यात आला आणि तोही केवळ सिम्युलेटरपुरता मर्यादित ठेवण्यात आला. प्रत्यक्ष रस्त्यावर कोणतेही प्रशिक्षण देण्यात आले नाही.

प्रशिक्षण कमी करणे आणि प्रत्यक्ष अनुभव न देणे यामुळेच अशी दुर्दैवी घटना घडली असावी. न्यायालयाने नमूद केले की मोरे याला पारंपरिक बस चालवण्याचा अनुभव असला तरी आश्चर्याची बाब म्हणजे ई-बस चालवण्यासाठी त्यांना कोणतेही प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले नाही.

## अमित शहांच्या हेलिकॉप्टरमध्ये बिघाड! प्रचारसभा रद्द

■ आसाम

**विधानसभा** निवडणुकीच्या प्रचारासाठी आसाम दौऱ्यावर असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला. हेलिपॅडवर उतरत असतानाच ही अडचण निर्माण झाल्याने सुरक्षेच्या कारणास्तव हेलिकॉप्टर न उतरवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे गोलाकगुंज येथील त्यांची प्रचारसभा रद्द करण्यात आली.

आसाम विधानसभा निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू आहे. या पाश्वभूमीवर अमित



शहा यांची गोलाकगुंज येथे सभा आयोजित करण्यात आली होती. हेलिकॉप्टर उतरण्याच्या वेळीच तांत्रिक बिघाड झाल्याने कार्यक्रम रद्द करावा लागला. सभेसाठी मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. सभा रद्द झाल्यानंतर अमित शहा यांनी मोबाईलद्वारे उपस्थितांशी संवाद साधत गैरसोयीबद्दल दिलगिरी व्यक्त केली. यानंतर ते त्याच हेलिकॉप्टरने पुढील नियोजित दूढनोई येथील प्रचारसभेसाठी रवाना झाले.

## कल्याण-शहाड पुलावर अपघात शिंदेसेनेच्या शहरप्रमुखाचा मृत्यू

**ठाणे** - कल्याण-शहाडला जोडणाऱ्या पुलावर झालेल्या अपघातात शिंदे गटाचे म्हारळ शहरप्रमुख डॉक्टर सोमनाथ पाटील यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी आयशर टेम्पो चालक बॉबी चंदन जुनीला अटक केली. बॉबीला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. डॉक्टर पाटील हे रात्री उशिरा दुचाकीवरून कल्याण-शहाड पुलावरून जात होते. त्याचवेळी आयशर टेम्पोने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

## जी.श्रीकांत यांची बदली थांबवण्यासाठी शिरसाट-सावेंचे फडणवीसांना साकडे

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर महापालिकेचे आयुक्त जी. श्रीकांत यांच्या बदलीच्या आदेशानंतर शहरातील राजकीय व प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली. शहरातील महत्त्वाच्या विकासकामांच्या पार्श्वभूमीवर ही बदली थांबवण्यासाठी मंत्री संजय शिरसाट आणि अतुल सावे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घातल्याची माहिती आहे.

राज्याचे मंत्री संजय शिरसाट आणि अतुल सावे यांनी आयुक्त जी. श्रीकांत यांची बदली तात्काळ स्थगित करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या मते शहरात सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेचे काम सध्या निर्णायक टप्प्यात आहे. या योजनेअंतर्गत २०० एमएलडी पाणी शहरात आणण्यासाठी मुख्य जलवाहिनीची चाचणी सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण होण्याच्या मार्गावर असताना आयुक्त बदलल्यास कामाची गती मंदावण्याची शक्यता आहे. महापौर समीर राजूरकर यांनीही या भूमिकेला पाठिंबा देत, पाणीपुरवठा योजना आणि नवीन कचरा संकलन यंत्रणा पूर्णत्वास जाईपर्यंत आयुक्तांची बदली टाळण्याची मागणी केली. मंत्री अतुल सावे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे ही विनंती करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## फॅशन स्ट्रीटजवळ महिलांच्या फिरत्या शौचालयात खानावळ

■ मुंबई

**मुंबई** शहरातील फॅशन स्ट्रीट परिसरात महिलांसाठी उभारण्यात आलेल्या फिरत्या शौचालयाचा गैरवापर होत आहे. महिलांच्या स्वच्छतेसाठी असलेल्या या सुविधेच्या जागेतच खानावळ चालवली जात असल्याचे उघड झाले आहे.




आझाद मैदानाजवळील या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून गुलाबी रंगातील फिरती बस स्वच्छतागृह म्हणून कार्यरत होती. या बसमध्ये महिलांसाठी सुमारे चार शौचालये तयार करण्यात आली आहेत. पण बसच्या मागील भागात छोटेखानी कॅफेच्या स्वरूपात खानावळ सुरू असल्याचे आढळून आले आहे. महापालिकेकडून या फिरत्या स्वच्छतागृहासाठी परवानगी देण्यात आली होती. त्या परवानगीचा गैरवापर करत जागेचा वापर खानावळीच्या व्यवसायासाठी केला जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या प्रकारावर माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी संताप व्यक्त केला असून, महिलांच्या गैरसोयीचा मुद्दा उपस्थित केला आहे. मुंबईतील स्वच्छतागृहांची स्थिती सुधारण्यासाठी व्यापक पुनर्विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबईत दादर, शिवाजी पार्क, सीएसएमटी, फॅशन स्ट्रीट, ग्रँट रोड, कीर्ती कॉलेज, प्रभादेवी या ठिकाणी बस-टॉयलेट्स उभारण्याचे काम सुरू आहे. त्यापैकी काही बस बंद अवस्थेत किंवा अडगळीत पडलेल्या आहेत.

## माणमध्ये अंगावर वीज पडल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

■ सातारा

**जिल्ह्यातील** माण तालुक्यात काल गुरुवारी सकाळी अचानक वादळी पाऊस सुरू झाला. या पावसातच वीज अंगावर कोसळल्याने एका शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना माण तालुक्यातील तोंडले गावात घडली.

खटाव तालुक्यात पुसेगाव, खटाव, वडूजसह बहुतांश भागातही विजांच्या कडकडाटासह झालेल्या पावसाने सर्वत्र पाणीच पाणी केले. लाला दाजी जाधव (६५) असे या मृत शेतकऱ्याचे नाव आहे. लाला जाधव हे काल दुपारी आपल्या तोंडले येथे बाशिंग शिवारातील शेतात काम करत होते. त्यावेळी अचानक वादळी पाऊस सुरू झाला. त्यानंतर काही वेळातच विजांचा कडकडाट सुरू झाला आणि त्यातील वीज लाला जाधव यांच्या अंगावर पडली. त्यामुळे ते जागीच कोसळून ठार झाले.

## पारंपरिक 'बगाड' उत्सवाचा बाणेर ग्रामस्थांचा हक्क कायम

**उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल**

■ मुंबई

**पुण्याच्या** बाणेर गावातील ऐतिहासिक आणि पारंपरिक 'बगाड' उत्सवाच्या जागेबाबत उच्च न्यायालयाने गुरुवारी महत्त्वपूर्ण निकाल दिला. बाणेर ग्रामस्थांचा उत्सवाच्या जागेवर सोहळा साजरा करण्याचा पारंपरिक हक्क आहे, असे न्यायमूर्ती एन. जे. जमादार यांच्या एकलपीठाने प्रतिवादी नवीन मालकांची याचिका फेटाळून लावली. यामुळे बाणेर ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला.

बाणेर येथील श्री भैरवनाथ पादुका मंदिरासमोरील जागेवर मागील अनेक पिढ्यांपासून हनुमंत जयंतीला 'बगाड' उत्सव साजरा केला जातो. मात्र, या जागेच्या मालकी हक्कावरून वाद निर्माण झाला होता. संबंधित जागा खरेदी करणाऱ्या नवीन मालकांनी (प्रतिवादींनी) तिथे बांधकाम करण्यास सुरुवात केली होती आणि ग्रामस्थांच्या उत्सवाला विरोध दर्शवला होता. याप्रकरणी न्यायमूर्ती एन. जे. जमादार यांनी सविस्तर सुनावणी घेऊन निकाल दिला. न्यायालयाने आपल्या निकालात विविध बाबी अधोरेखित केल्या. हा केवळ जमिनीचा वाद नसून एका समुदायाचा शेकडो वर्षांपासून चालत आलेला पारंपरिक हक्क आहे. १९६७ च्या विक्रीखतात देखील जागेचा उल्लेख उत्सवासाठी होत असल्याचे प्राथमिक दृष्ट्या दिसून येते. तसेच ग्रामस्थांनी सादर केलेले जुने फोटो आणि पुरावे महत्त्वाचे आहेत, असे निरिक्षण न्यायालयाने नोंदवले. पुणे जिल्हा न्यायालयाने यापूर्वी दिलेला स्थगितीचा आदेश योग्य असून त्यात हस्तक्षेप करण्याची गरज नसल्याचेही न्यायमूर्ती जमादार यांनी नमूद केले.

## ४० फूट खोल नदीपात्रात बुडून कामगाराचा मृत्यू

■ पुणे

**पुण्याच्या** हवेली तालुक्यातील वरदाडे येथे रिंग रोडच्या कामादरम्यान विजय कुमार या ऑपरेटरचा बुडून मृत्यू झाला. वरदाडे परिसरात सुरू असलेल्या रिंग रोड प्रकल्पाच्या कामादरम्यान विजय कुमार हा क्रेनवर चढत होता. विजय शिडीवरून चढत असताना त्याचा तोल जाऊन पाय घसरला आणि तो थेट सुमारे ४० फूट खोल नदीपात्रातील पाण्यात कोसळला.विजय याला पोहता येत नसल्यामुळे तो पाण्यातून बाहेर येऊ शकला नाही आणि त्यातच त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस, हवेली आपत्ती व्यवस्थापन रेस्क्यू टीम तसेच अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

## गोदावरी विकास महामंडळाच्या निधीत थेट ३० टक्के कपात

**भूसंपादनाची ३०० कोटी रुपयांची देणी थकित**

■ छत्रपती संभाजीनगर

**गोदावरी** मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या अर्थसंकल्पीय निधीत मार्च २०२६ अखेर सुमारे ३० टक्के कपात करण्यात आली आहे, ज्यामुळे अनेक सिंचन प्रकल्प रखडण्याची शक्यता आहे.३,६०० कोटींच्या अर्थसंकल्पापैकी केवळ २,२०० कोटी रुपये डिसेंबर २०२५ पर्यत जारी झाले,तर भूसंपादनासाठीचा ३०० कोटींचा निधी मिळालेला नाही. परिणामी कंत्राटदारांची देणी थकीत आहेत.

या महामंडळाकडे २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सुमारे ३,६०० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक होते. यापैकी पगार, भत्ते, प्रकल्पांचे चालू कामकाज आणि देखभाल यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, तर धरण प्रकल्पांसाठी ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली होती, त्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी ५५० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. डिसेंबर २०२५ पर्यत सरकारने टप्प्याटप्प्याने सुमारे २,२०० कोटी रुपये वितरित केले होते. त्यात शेतकऱ्यांसाठी असलेल्या जवळपास १५७ कोटी रुपयांचा समावेश होता. कंत्राटदार आणि शेतकऱ्यांची देणी फेडण्यासाठी उर्वरित निधी मार्च अखेरपर्यत मिळेल अशी अधिकाऱ्यांना अपेक्षा होती. मात्र आर्थिक वर्षाच्या अखेरीस मंजूर निधीमध्ये जवळपास ३० टक्के कपात करण्यात आली.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# नेमेचि येती अवकाळीच्या कळा

**युद्धाच्या** झळा वेगवेगळ्या पद्धतीने छळत असताना त्यात अवकाळीने भर घालून आणखीनच दाणादाण उडवलेली आहे. राज्याच्या सगळ्या परिसरामध्ये या उन्हाळी अवकाळी पावसाने ज्या पद्धतीने थैमान घातले आहे ते पाहिल्यानंतर 'नेमेचि येतो पावसाळा' या म्हणीमध्ये थोडा बदल करून 'नेमेचि येती अवकाळीच्या कळा' असे त्याचे वर्णन करण्याची वेळ आलेली आहे. अवकाळी पावसामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. प्रत्यक्ष पावसाळ्यात होणाऱ्या नुकसानीपेक्षा या अवकाळीचा तडाखा जबरदस्त मानला पाहिजे कारण या काळामध्ये रब्बी पिकांचा हंगाम असतो आणि यावेळी गहू, मका, द्राक्ष, फळफळावळ, केळी, संत्रा, डाळिंब यासारख्या उत्पादनांना मोठा वाव असतो. कोकणासारख्या भागात तर आंब्याला मोठी मागणी असते परंतु हा अवकाळी अशा काही काळामध्ये येतो की ज्या वेळात आता ही सगळी पिके काढून विकण्याची वेळ आलेली असते. त्या काळात पिकांची योग्य ती काळजी घेऊन ती पीकं विक्रीसाठी नेण्याच्या ऐन हंगामामध्ये अवकाळीच्या तडाख्याला सामोरे जावे लागते आणि त्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. अवकाळी पाऊस हा आता काही नवीन राहिलेला नाही तो दरवर्षीचा प्रकार झालेला आहे. एवढेच नव्हे तर तो केव्हा आणि कसा येईल याचा सुद्धा कुठलाही भरोसा राहिलेला नाही. परंतु वेधशाळांच्या तत्परतेमुळे निदान दोन चार दिवस आधी अवकाळी येणार असल्याच्या सूचना मिळतात. तो कुठे कुठे येईल आणि काय काय प्रमाणामध्ये येईल याचा सुद्धा साधारणपणे अंदाज व्यक्त केला जातो. पण ही सगळी माहिती मिळाल्यानंतर शेतकरी देखील सावध होत नाहीत आणि सरकार सुद्धा ढिम्मपणाने बसून राहते. खरे तर एखादे चक्रीवादळ जेव्हा येते त्यावेळेला सरकारकडून एनडीआरएफच्या टीम तैनात केल्या जातात. लष्करालाही सावध ठेवले जाते. कारण कुठल्या प्रसंगात हे चक्रीवादळ कशा पद्धतीने नुकसान करेल याचा भरोसा नेम नसतो. विशेषतः जीवित आणि वित्त हानी होऊ नये ती कमीत कमी प्रमाणात व्हावी याकरता चक्रीवादळाच्या काळामध्ये जशी सावधानता बाळगली जाते अगदी पावसाळ्याच्या काळात सुद्धा अशा प्रकारची वादळ येऊन मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता असते.

**नुकसान भरपाईवरचा खर्च**

हे नुकसान टाळण्याकरता एनडीआरएफच्या टीम सतत सावध ठेवल्या जातात. त्याच पद्धतीने वेधशाळांकडून अंदाज व्यक्त झाल्यानंतर एनडीआरएफच्या टीमप्रमाणेच शेती आणि शेतकऱ्यांसाठीसुद्धा अशा प्रकारचे सहाय्य करणारे पथक निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांना तातडीने सावध करून आवश्यक ती मदत पोहोचवता आली पाहिजे आणि आपली पिके कशी वाचवता येतील याच्याबद्दलचे मार्गदर्शन किंवा साधनसामुग्री उपलब्ध करून दिली पाहिजे. आज तंत्रज्ञान इतके विकसित झालेले आहे की काही क्षणांमध्ये पिकांना अवकाळी पासून वाचवण्याची व्यवस्था करता येऊ शकते. विदर्भामध्ये तर या अवकाळीने इतका जबरदस्त तडाखा दिला की अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात गारपीट झाली आणि मार्केट यार्डमध्ये उघड्यावर ठेवलेली धान्याची पोती या पावसामुळे खराब झाली. खरे तर अवकाळी पाऊस येणार म्हटल्यानंतर ही पोती तातडीने उचलण्याचे काम सुद्धा संबंधित मार्केट यार्डने किंवा शेतकऱ्यांनी करायला हवे होते परंतु ते सुद्धा केले गेले नाही. अवकाळी पावसाचा इशारा मिळूनही जर योग्य ती उपाययोजना केली जात नसेल तर त्या पावसाला दोष देऊन उपयोगाचे नाही. यंत्रणा सक्षम नाहीत आणि तातडीने उपाययोजना करण्याची तत्परता दाखवली जात नाही. त्यामुळे अवकाळीचे नुकसान सातत्याने वाढत आहे. सरकारला याबाबतची जाणीव व्हायला पाहिजे. कारण ज्या काळामध्ये शेतकऱ्यांना उत्पन्न मिळण्याची शाश्वती असते त्या काळात या सगळ्या प्रयत्नांवर पाणी फिरवण्याचे काम अवकाळी पाऊस करतो आणि अवकाळीचा हा प्रकार म्हणजे केवळ निसर्गाचा प्रकोप नसून सरकारच्या अकार्यक्षम व्यवस्थेचा प्रकोप म्हणावा लागेल. जर योग्य त्या व्यवस्था तातडीने करता आल्या त्या त्या जिल्हाधिकाऱ्याने आपापल्या भागामध्ये या अवकाळीपासून पिकांचे आणि अन्य गोष्टींचेही संरक्षण करण्याच्या नीट सूचना देऊन मार्गदर्शन केलं तर या संकटामुळे होणारे मोठे नुकसान टाळता येऊ शकते.

**आख्खे क्रिकेट मैदान झाकता येते.**

वारंवार तीच तीच संकटे येतात पण संकटे येऊनही जर उपाययोजना होत नसेल आणि सरकारी यंत्रणांना जाग येत नसेल तर अवकाळीपेक्षाही अकार्यक्षम दिवाळीखोरीचा हा सगळा परिणाम ठरतो. त्याचे नुकसान सगळ्यांनाच भोगावे लागते. आताच्या काळामध्ये अतिशय वेगाने व्यवस्था उभ्या करता येऊ शकतात. परंतु सरकार त्या बाबतीत पुरेसे जागे झालेले नाही. दरवर्षी हा अवकाळी पाऊस येणार हे लक्षात घेऊन व्यवस्था व्हायला हव्यात. अगदी अंदाजपत्रकामध्ये सुद्धा अवकाळीच्या उपाययोजनांसाठी स्वतंत्र निधी राखून ठेवण्याची आवश्यकता आहे. केवळ नुकसान भरपाई देऊन उपयोगाचे नाही तर नुकसान होणारच नाही यासाठीच्या उपाययोजनांकरता तितक्याच ठोस प्रयत्नांची आवश्यकता आहे. अगदी क्रिकेट मैदानावरसुद्धा सामना सुरू असताना पाऊस येईल हे गृहित धरून पीच खराब होऊ नये म्हणून व्यवस्था केलेली असते. सामना सुरू असताना पावसाची चाहूल लागताच अगदी काही मिनिटामध्ये सगळे मैदान झाकण्याची व्यवस्था केली जाते. याच पद्धतीच्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पिकांचे संरक्षण करणाऱ्या व्यवस्थेची आवश्यकता आहे. अशा संकटांतून होणाऱ्या नुकसानीपेक्षा आधुनिक व्यवस्थांवर एकदाच केलेला खर्च शेतकऱ्यांना आणि सरकारलादेखील साहाय्यभूत ठरू शकतो कारण नुकसान भरपाई देण्याऐवजी नुकसान टाळणारी व्यवस्था अधिक महत्त्वाची ठरू शकते. नवी संकटं आणि त्यासाठी नवे अत्याधुनिक प्रयत्न गरजेचेच ठरतात.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

देणारा हा कायम सर्वश्रेष्ठच असतो.
मग तो आधाराचा शब्द असो किंवा अडचणींच्या वेळी दिलेला मदतीचा हात.

## पंचांग

**शनिवार ४ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



*** चैत्र कृष्ण द्वितीया**
**नक्षत्र - स्वाती**
**जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० तूळ**

**रवी उदय- ०६-३२,**
**रवी अस्त- १८-५२**

**श्री श्रीधर स्वामी पुण्यतिथी - सज्जनगड**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१ ई-मेलः contact@navakal.in

**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.

Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

# आंबा पुलिसेरी



आंबा पुलिसेरी हा केरळचा पारंपरिक पदार्थ आहे, जो सणांमध्ये बनविला जातो. ही एक गोड-आंबट करी आहे. भाताबरोबर खायला खूप चविष्ट लागते.

★ **साहित्यः** - ६ लहान पिकलेले आंबे, ४ चिरलेल्या हिरव्या मिरच्या, १ कप पाणी, अर्धा चमचा हळद, दीड कप ओले किसलेले खोबरे, १ चमचा लाल मिरची पावडर, १ कांदा, १ चिमूटभर जिरे, मीठ चवीनुसार, १ लिटर घट्ट दही, १ चमचा मेथी दाणे, २ चमचे जिरे, ३ सांबार लाल मिरच्या, १/४ चमचा मोहरी, ७-८ कढीपत्ता, खोबरेल तेल १ टीस्पून, २ टीस्पून तूप.

★ **कृतीः** - प्रथम आंबे सोलून तुकडे करून घ्या. कढईत हे आंबे, त्यात हिरवी मिरची, कढीपत्ता, लाल मिरची पावडर, हळद, मीठ आणि पाणी घालून मध्यम आचेवर शिजवा. पाणी उकळायला लागले की त्यावर झाकण ठेऊन ५ मिनिटे शिजवा. मिक्सरच्या भांड्यात नारळ, कांदा आणि जिरे यांची बारीक पेस्ट बनवा आणि शिजत ठेवलेल्या आंब्यामध्ये मिसळा. उकळी येईपर्यंत ढवळत राहा आणि मंद आचेवर ३ मिनिटे शिजवा. नंतर त्यात फेटलेले दही घाला. ते चांगले गरम करा. जास्त घट्ट वाटत असेल तर वरून गरम पाणी टाकू शकता. आचेवरून काढा. एका पॅनमध्ये खोबरेल तेल आणि तुप गरम करा. त्यात सांबार मिरची, मोहरी, जिरे आणि कढीपत्ता घाला. चांगली फोडणी करा. ही फोडणी करीमध्ये घालून त्यावर झाकण ठेवा. ५ मिनिटांनंतर चांगले मिक्स करून खायला घ्या चविष्ट आंबा पुलिसेरी.

## क्रीडा

# आयपीएलमध्ये आज डबल हेडर सामने

## दिल्ली-मुंबई आणि गुजरात-राजस्थान लढत

**आयपीएलमध्ये उद्या दुपारपासून डबल हेडर सामने होणार आहेत. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर दुपारी ३ वाजल्यापासून सुरू होणारा आयपीएलचा आठवा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात होणार आहे, तर रात्री ८ वाजल्यापासून अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडणार्या नवव्या सामन्यात गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स भिडणार आहे. राजस्थान, दिल्ली आणि मुंबईने आपले पहिले सामने जिंकले आहेत. हे तिन्ही संघ सलग दुसरा विजय मिळवण्यासाठी मैदानावर उतरणार आहेत.तर गुजरात आपले विजयाचे खाते उघडण्याचा प्रयत्न करणार आहे.**



■ नवी दिल्ली

**या** सामन्यात दिल्लीच्या गोलंदाजांना मुंबई इंडियन्सच्या फलंदाजांसमोर एका कठीण आव्हानाला सामोरे जावे लागेल. मुंबई इंडियन्स संघात रोहित शर्मा, तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादव यांच्यासारखे फलंदाज आहेत. ते गोलंदाजांवर जोरदार हल्ला करण्यात माहिर आहेत. दिल्ली कॅपिटल्सची सलामीच्या सामन्यात लखनौ सुपरजायंट्सविरुद्ध चांगली सुरुवात झाली नाही. त्यानंतर २२ वर्षीय समीर रिझवीने नाबाद अर्धशतक झळकावत उल्लेखनीय संयम आणि परिपक्वता दाखवली. रिझवीची कामगिरी दिल्लीसाठी एक चांगला संकेत आहे, परंतु त्यांच्या वरच्या फळीतील कमकुवतपणा ही चिंतेची बाब आहे. आता, त्यांना जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखालील मुंबईच्या मजबूत गोलंदाजी आक्रमणाचा सामना करायचा आहे आणि ते त्यांच्यासाठी सोपे नसेल. गोलंदाज मिचेल स्टार्कच्या अनुपस्थितीतही कॅपिटल्सचे गोलंदाजी युनिट अधिक आत्मविश्वासपूर्ण दिसत होते. स्टार्क या सामन्यासाठी उपलब्ध नसेल.जसप्रीत बुमराह आणि ट्रेंट बोल्ट यांच्याकडून चांगल्या कामगिरीची आशा मुंबईला आहेत. त्यासोबत पहिल्या सामन्यात तीन बळी घेणारा शार्दुल ठाकूर पुन्हा एकदा चांगली गोलंदाजी करण्यास उत्सुक आहे.

नरेंद्र मोदी स्टेडियमवरील फलंदाजीसाठी अनुकूल खेळपट्टीवर गुजरातच्या गोलंदाजांना राजस्थान सलामीवीर फलंदाज वैभव सूर्यवंशीविरुद्ध कठीण परीक्षेला सामोरे जावे लागेल. कागिसो रबाडा, प्रसिद्ध कृष्णा आणि मोहम्मद सिराज हे वेगवान गोलंदाजी जबरदस्त मारा करण्यात माहिर आहेत. त्यामुळे उद्या सामन्यात त्याची मोठी कसोटी लागणार आहे.राजस्थान रॉयल्सकडे नांद्रे बर्गर आणि जोफ्रा आर्चर यांच्या रूपात दोन चांगले वेगवान गोलंदाज आहेत. हे दोघेही या सामन्याच्या सुरुवातीच्या षटकांमध्ये शुभमन गिल, साई सुदर्शन आणि जोस बटलर यांना आव्हान देण्याचा प्रयत्न करतील.कर्णधार गिल आणि बटलर हे दोघेही मुल्लानपूरमध्ये पंजाब किंग्सविरुद्ध चांगली कामगिरी करू शकले नाहीत.

# फिफा विश्वचषक! इराणच्या मागणीवर अद्याप तोडगा नाही

■ अंकारा

**पश्चिम** आशियातील वाढता तणाव आणि युद्धसदृश परिस्थितीचा फिफा फुटबॉल विश्वचषकावर परिणाम होण्याची शक्यता आहे. युद्धग्रस्त इराणच्या फुटबॉल संघाने अमेरिकेत होणारे सर्व सामने मेक्सिकोमध्ये हलवावेत, अशी मागणी फिफाकडे केली होती. त्यावरुन तुर्कीत फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो आणि इराणी फुटबॉल अधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीतून या मुद्दावर तोडगा निघाला नाही. यापूर्वी फिफाने स्पष्ट केले आहे की, स्पर्धेच्या वेळापत्रकात कोणताही बदल होणार नाही आणि इराणला आपले सामने अमेरिकेतच खेळावे लागतील. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्यांमुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाली. विश्वचषकात इराणच्या खेळाडूंच्या सुरक्षेबाबत त्यांनी यापूर्वी चिंता व्यक्त केली होती. फिफाने सातत्याने आपली स्पष्ट भूमिका कायम ठेवली आणि इन्फँटिनो यांनी इराणी संघाला सर्व आवश्यक सुविधा आणि सुरक्षा पुरवली जाईल, असे आश्वासन दिले.

# जेजे हॉस्पिटलच्या क्रिकेटपटूंचे डीन डॉ. भंडारवारांकडून कौतुक

■ मुंबई

**आत्माराम** मोरे स्मृती चषक आंतरहॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धेत जेजे हॉस्पिटलने यंदाच्या क्रिकेट हंगामातील पहिले विजेतेपद पटकावल्याबद्दल जेजे हॉस्पिटलचे डीन डॉ. अजय भंडारवार यांनी विशेष कौतुक केले. रुग्णालयीन सेवानिष्ठेने करत क्रिकेट खेळात जेजे हॉस्पिटलच्या संघाने अव्वल कामगिरी केल्याबद्दल हॉस्पिटलचे डीन डॉ. अजय भंडारवार, अधीक्षक डॉ. संजय सुरासे, डॉ.अरुण पाटील, डॉ.अरुण राठोड यांनी जेजे हॉस्पिटल क्रिकेट संघाचे कप्तान नरेश शिवतरकर आणि संघाचे अभिनंदन केले. यावेळी जेजे हॉस्पिटल कबड्डी संघाचे कप्तान राजेश शिवतरकर, क्रिकेटपटू सुभाष शिवगण, प्रकाश सोळंकी, अक्षय सावंत, जगदीश वाघेला, अमोल वरेकर, रोहित सोळंकी, प्रवीण सोळंकी, हेमंत चाचीया, साभर मारू आदी उपस्थित होते.

# पाकिस्तान वेटलिफ्टिंग अधिकाऱ्यांवर आजीवन बंदी

**लॉसेन**- कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्ट' (सीएएस) च्या 'अँटी डोपिंग विभागा'ने (एडीडी) पाकिस्तान वेटलिफ्टिंग फेडरेशनचे निलंबित प्रमुख हाफीज इम्रान बट आणि प्रशिक्षक इरफान बट यांच्यावर आजीवन बंदी लादली आहे. २०१४ ते २०१६ या कालावधीत देशातील खेळाडूंना बंदी घातलेली उत्तेजक द्रव्ये दिल्याप्रकरणी त्यांच्या सहभागामुळे ही कारवाई केली. पाकिस्तान वेटलिफ्टर अबुबाकर गनी यांच्यावरही ४ वर्षांची बंदी घालण्यात आली. डोप चाचणीत अपयशी ठरल्याचे स्पष्टीकरण देण्यासाठी त्याने बनावट वैद्यकीय चिठ्ठ्या सादर केल्या होत्या. ताश्कंद येथे २०२१ मध्ये झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेदरम्यान गनीच्या चाचणीत 'टॅमॉक्सिफेन मेटाबोलाईट' हे प्रतिबंधित संप्रेरक आणि चयापचय नियंत्रक आढळले होते.

# फक्त माझ्या यशावर जळतात पराभवानंतर रहाणे भडकला


■ कोलकाता



**सनरायझर्स** हैदराबाद संघाविरुद्ध कोलकात्याचा ६५ धावांनी पराभव झाल्यानंतर कोलकात्याचा कर्णधार अजिंक्य रहाणे टीकाकारांवर चांगलाच भडकला. टीकाकार सामने न पाहताच माझ्यावर वक्तव्य करत आहेत. ही लोक फक्त माझ्यावर जळत आहेत, असे रहाणे म्हणाला.

रहाणे म्हणाला की, २०२३ पासून माझा स्ट्राईक रेट सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक आहे. जे लोक माझ्याबद्दल बोलत आहेत, ते कदाचित सामने पाहत नाहीत किंवा त्यांच्या मनात माझ्याबद्दल काहीतरी अजेंडा आहे. त्यांना मला खेळताना पाहणे आवडत नसावे. मला जे यश मिळाले आहे, कदाचित लोक त्याचा हेवा करतात किंवा माझ्यावर जळतात. मी याची पर्वा करत नाही. एका डावामुळे काहीही बदलत नाही. माझा हेतू योग्य होता, पण कधीकधी लय सापडत नाही. लोक माझ्याबद्दल बोलत आहेत ही चांगली गोष्ट आहे, मग ते सकारात्मक वा नकारात्मक असो.

# अभिषेकला २५ टक्के दंड बीसीसीआयची कारवाई



■ कोलकाता

**कोलकत्याविरुद्ध** सामन्यात हैदराबादचा सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्माने अश्लील शब्दांचा वापर केला होता. त्यामुळे त्याला बीसीसीआयने मॅच फीच्या २५ टक्के दंड ठोठावला. त्याने कलम २.३ अंतर्गत 'लेव्हल १' चा गुन्हा मान्य केला. मात्र ही घटना नेमकी कधी घडली, याचा उल्लेख आयपीएलने आपल्या निवेदनात केला नाही. आयपीएलने निवेदनात म्हणाले की, अभिषेकने कोलकात्याविरूद्ध झालेल्या सामन्यात आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्या मॅच फीच्या २५ टक्के दंड आकारण्यात आला.

# रोटरी क्लब कॅरम स्पर्धेत मर्चंड, तरेची विजय सलामी

■ मुंबई

**पार्लेश्वरच्या** रोटरी क्लब ऑफ मुंबई आयोजित आणि छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीच्या (जुहू) सहकार्याने ६ व्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेला आज विलेपार्ले येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल येथे पुरुष एकेरी गटाने प्रारंभ झाला.

पुरुष एकेरी पहिल्या फेरीत संतोष मर्चंडने किरण बोबडेवर ५-२५, १७-१६, २५-४, शांतीलाल जातीयाने नरेंद्र तरेवर २५-५, २५-०, गिरीधर भोजने विश्वनाथ शिवलकरवर २५-४, २५-९, योगेश केरकरने शंकर सावर्डेकर यांच्यावर ९-२५, २५-२, २०-६, जितेंद्र राठोडने असगर शेखवर १०-२२, २५-१७, २५-१०, नूर महम्मद शेखने झहीर खानवर १६-१५, २५-०, शाबीर शेखने ओंकार म्हसकरवर १६-११, २४-१३, सोहम जाधवने प्रशांत कांबळेवर २५-५, १३-२३, २३-९, आदित्य पारधीने अनुराग कलमकरवर १९-२५, २५-४, २५-१८ अशा विजय मिळवला.

# कबड्डी स्पर्धा! एसआयईएस संघाची अंतिम फेरीत धडक

■ मुंबई

**टागोर** नगर मित्र मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेत एसआयईएस संघाने अंतिम फेरीत धडक दिली. पुरुष गटात नवरत्न मंडळाने उपांत्य फेरी गाठली. विक्रोळी पूर्व येथील साईबाबा मंदिर शेजारील मैदानातील मॅटवर झालेल्या महिलांच्या उपांत्य फेरीत कुर्ल्याच्या एसआयईएस संघाने आरंभ स्पोर्ट्सवर ३२-०९ अशी सहज मात केली. पूर्वार्धात २ लोण देऊन २०-०४ अशी आघाडी घेत आपल्या विजयाचा



पाया रचला. उत्तरार्धात तिच आक्रमकता कायम ठेवत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. याअगोदर झालेल्या सामन्यात आरंभ मंडळाने मोनिका शिवगण, साक्षी शिगवण यांच्या चतुरस्त्र खेळाने घाटकोपरच्या निर्विघ्न संघावर २२-१६ असा विजय मिळवीत उपांत्य फेरी गाठली होती.

पुरुषांच्या उपांत्यपूर्व सामन्यात विक्रोळीच्या नवरत्न मंडळाने कांजूरच्या सत्यम सेवा संघाचा प्रतिकार २२-१६ असा मोडून काढत उपांत्य फेरी गाठली. रोहन शेडगे, गौरव पाटील यांच्या चढाई पकडीच्या उत्कृष्ट खेळाला या विजयाचे श्रेय जाते. सत्यमच्या ऋग्वेद तोरसकरने दुसऱ्या डावात छान लढत दिली. या अगोदर झालेल्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात चेंबूर क्रीडा केंद्राने घाटकोपरच्या अमरज्योत मंडळाचा कडवा प्रतिकार २६-२१ असा संपविला. मध्यंतराला १२-१५ अशा ३ गुणांनी पिछाडीवर पडलेल्या चेंबूर केंद्राने मध्यंतरानंतर टॉप गिअर टाकत ५ गुणांच्या फरकाने विजय साकारला.

# म्हापसा बसस्थानकातील मॉलला व्यापाऱ्यांचा विरोध

■ पणजी

**गोव्यातील** म्हापसा बसस्थानकावर नियोजित लक्झरी शॉपिंग मॉलला स्थानिक व्यापाऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या मॉलमुळे पिढ्यानपिढ्या व्यवसाय करणाऱ्या अडीच हजारांहून अधिक छोट्या व्यापाऱ्यांच्या उपजीविकेवर गदा येईल आणि पारंपरिक बाजारपेठेचे अस्तित्व धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या प्रकल्पाऐवजी सध्याच्या मार्केटच्या नूतनीकरणाची मागणी जोर धरत आहे.

या कॉर्पोरेट मॉलमुळे छोटा व्यापारी टिकू शकणार नाही,परिणामी अनेक कुटुंबे बेरोजगार होण्याची भीती आहे. म्हापसा



बाजार ही उत्तर गोव्याची आर्थिक वाहिनी आणि सांस्कृतिक केंद्र आहे, ज्याचे कॉर्पोरेट मॉलमुळे नुकसान होईल. सध्याच्या म्हापसा म्युनिसिपल मार्केटमध्ये गटारे, वीज आणि स्वच्छतेच्या समस्या असताना नवीन मॉलला निधी देण्याऐवजी विद्यमान मार्केट सुधारण्याची मागणी आहे. बसस्थानकावर शॉपिंग मॉल झाल्यास वाहतूक कोंडी वाढेल. व्यापाऱ्यांनी हा प्रकल्प रद्द न केल्यास तीव्र

## सध्याच्या मार्केटच्या नूतनीकरणाची मागणी

आंदोलनाचा इशारा दिला आहे.व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे की, बसस्थानक हे प्रवाशांसाठी असावे,ते व्यावसायिक केंद्रात रुपांतरित करू नये. २७ हजार चौरस मीटर जागेत उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पात बस टर्मिनलसोबतच या प्रशस्त व्यापारी संकुलाचा समावेश करण्यात आला आहे.

देश विदेश

# नॅशनल बँक ऑफ पाकिस्तानची व्हॉट्सअॅप बँकिंग सेवा सुरू

■ कराची

**ग्राहकांची** सुविधा वाढवण्यासाठी नॅशनल बँक ऑफ पाकिस्तानने (एनबीपी) व्हॉट्सअॅप बँकिंग सेवा सुरू केली आहे. या सेवेमुळे ग्राहकांना चौकशी करणे, मिनी स्टेटमेंट पाहणे, संपूर्ण खाते विवरण मागवणे आणि अतिरिक्त बँकिंग पर्याय शोधणे शक्य होईल. एनबीपीचे अध्यक्ष रहमत अली हसनी म्हणाले, व्हॉट्सअॅप बँकिंगचा शुभारंभ हा डिजिटल उपक्रम स्वीकारण्याच्या आणि लाखो नागरिकांपर्यंत शक्य तितक्या सोप्या पद्धतीने बँकिंग सेवा पोहोचवण्याच्या आमच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. हा टप्पा आमच्या व्यापक डिजिटल परिवर्तन प्रवासाचा एक भाग आहे. आर्थिक सेवा फक्त एका मेसेजच्या अंतरावर उपलब्ध करून देत आहोत.

# सायप्रस मिशननंतर पाकिस्तानी आयशा चर्चेत! फोटो व्हायरल

■ कराची



**समाज** माध्यमांवर सध्या मेजर आयशा खान या एका नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. पाकिस्तान लष्करातील या महिला अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तृत्वाने आणि विशेषतः संयुक्त राष्ट्रांच्या शांती सेनेतील कामगिरीमुळे जागतिक स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली.

नुकताच त्यांनी युनायटेड नेशन्स पीसकीपिंग फोर्स इन सायप्रसमधील आपला सेवाकाळ पूर्ण केला. सायप्रसमधील या मिशनदरम्यान त्यांच्या निरोप समारंभाचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. मेजर आयशा खान या युनायटेड नेशन्स पीसकीपिंग फोर्स इन सायप्रसमध्ये'मिलिटरी पब्लिक इन्फॉर्मेशन ऑफिसर म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या निरोपाच्या वेळी युनायटेड नेशन्स पीसकीपिंग फोर्स इन सायप्रसने आपल्या अधिकृत हँडलवरून त्यांचे विशेष कौतुक केले. आज आम्ही मेजर आयशा खान यांना निरोप देत आहोत.

# संरक्षण मंत्र्यांनी जगाला दाखवली भारताच्या सागरी शक्तीची चुणूक

■ नवी दिल्ली

**संरक्षण** मंत्री राजनाथ सिंह यांनी आज एकाच वेळी दोन मोठ्या संरक्षण



प्रकल्पांची माहिती देऊन जगाला भारताच्या सागरी सामर्थ्याची चुणूक दाखवली. १७ अ प्रकल्पांतर्गत तयार करण्यात आलेली अत्याधुनिक आयएनएस तारागिरी ही युद्धनौका आज नौदलाच्या सेवेत अधिकृतपणे रुजू झाली. तर आयएनएस अरिदमन ही अण्वस्त्रवाहू पाणबुडी लवकरच नौदलाच्या ताफ्यात दाखल होणार आहे. तारागिरी ही स्टेल्थ फ्रिगेट प्रकारातली म्हणजे शत्रुच्या रडारला चकवा देणारी युद्धनौका आहे. तर अरिदमन ही भारताची दुसरी स्वदेशी अण्वस्त्रवाहू पाणबुडी आहे. ही पाणबुडी दीर्घकाळ पाण्याखाली राहण्यास सक्षम असून शत्रुच्या रडारला चकवा देऊ शकते.

# प्रचारासाठी अमित शहा यांचा १५ दिवस बंगालमध्ये मुक्काम

■ कोलकाता

**मी** पुढील १५ दिवस बंगालमध्येच मुक्कामी असणार आहे. तृणमूल काँग्रेसला मुळासकट उखडून टाकण्यासाठी आणि थेट बंगालच्या उपसागरात फेकून देण्यासाठी प्रत्येकाने कोणत्याही भीतीशिवाय मतदान करावे, असे आवाहन केंद्रीय गहमंत्री अमित शहा यांनी काल पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे 'रोड शो' दरम्यान केले. भाजपाचे ज्येष्ठ नेते सुवेंदू अधिकारी यांनी काल उमेदवारी अर्ज भरला. यावेळी काढलेल्या रोड शो वेळी केंद्रीय मंत्री अमित शहा म्हणाले की, सुवेंदू हे फक्त नंदीग्राममधून निवडणूक लढवू इच्छित होते. मात्र ममतांना त्याच्या घरातच पराभूत करणे आवश्यक आहे, असे मी त्यांना सांगितले. ममता बॅनर्जी या भवानीपूर आणि नंदीग्राम या दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवत आहेत. भाजपाने त्यांच्या विरोधात दोन्ही ठिकाणी सुवेंदू अधिकारी यांना उमेदवारी दिली आहे.

# न्यूझीलंड-कुक आयर्लंडसमध्ये ऐतिहासिक संरक्षण करार

■ आकलंड

**न्यूझीलंड** आणि कुक आयर्लंड या दोन्ही देशांनी एका महत्त्वपूर्ण संरक्षण आणि सुरक्षा करारावर स्वाक्षरी केली. या करारामुळे गेल्या वर्षभरापासून चीनसोबतच्या वाढत्या संबंधांवरून निर्माण झालेला राजनैतिक पेच अखेर संपुष्टात आला. या नवीन घोषणेनुसार कुक आयलंडने न्यूझीलंडला आपला पसंतीचा सुरक्षा भागीदार म्हणून मान्यता दिली.

या वादाची ठिणगी फेब्रुवारी २०२५ मध्ये पडली होती, जेव्हा कुक आयर्लंडसचे पंतप्रधान मार्क ब्राऊन यांनी बीजिंग दौऱ्यात चीनसोबत सामरिक भागीदारी करारावर स्वाक्षरी केली होती. या कराराचा तपशील गोपनीय ठेवल्यामुळे न्यूझीलंडने चिंता व्यक्त केली होती आणि कुक आयलंड्सला मिळणारी लाखो डॉलरची मदत

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा




रोखली होती. मात्र, आता नवीन करार झाल्यामुळे ही मदत पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे न्यूझीलंडचे परराष्ट्र मंत्री विन्स्टन पीटर्स यांनी स्पष्ट केले. कुक आयर्लंडस हा न्यूझीलंडसोबत 'मुक्त सहकार्य' संबंध असलेला स्वशासित देश आहे.

येथील १५,००० नागरिकांचे संरक्षण न्यूझीलंडचे सैन्य करते आणि त्यांना न्यूझीलंडचे पासपोर्ट वापरण्याचा अधिकार आहे. दक्षिण पॅसिफिकमधील वाढत्या चिनी प्रभावाच्या पार्श्वभूमीवर, या लहान बेट राष्ट्रांनी आपल्या पारंपरिक युती आणि बीजिंगकडून येणारे आर्थिक प्रस्ताव यामध्ये संतुलन राखणे आव्हानात्मक बनले आहे. या करारामुळे दोन्ही देशांमधील संबंधांमधील संदिग्धता दूर झाली.

## बॉलीवुड अभिनेता
# विनोद मेहरा

**साधारण चेहऱ्याचे अभिनेते विनोद मेहरा यांची पडद्यावरील प्रतिमा एका सामान्य शेजाऱ्यासारखी होती आणि ते कधीच सुपरस्टार पद मिळवू शकले नाहीत. मात्र, १९७१ पासून ते १९९० पर्यंत १९ वर्षांमध्ये त्यांनी १०० चित्रपटांमध्ये अभिनय केला. तसेच बालकलाकाराच्या रूपातही त्यांनी 'नरसी भगत' आणि 'शारदा' मध्ये अभिनय केला आहे. किशोरवयात 'अंगुलीमाल' मध्येही काम केले आहे.**



विनोद मेहरा यांचा प्रथम चित्रपट १९७१ साली रीटा हा होता, सोबत होती तनुजा ते १९७१ मध्ये राजकुमार, हेमा मालिनी आणि राखी याचा बरोबर 'लाल पत्थर' मध्ये युवा नायकाच्या रूपात सादर झाले. विनोद मेहरा यांच्या फिल्म करियरला मौसमी चटर्जीने हात दिला, शक्ती सामंत यांची फिल्म अनुराग (१९७२) मध्ये मौसमी-विनोद प्रथम एकत्र आले. मौसमी चटर्जी यांनी एक दृष्टिहीन युवतीचा रोल अतिशय उत्तम केला होता. विनोद मेहरा यांनी एक आदर्शवादी नायकाची भूमिका केली होती. नायकाला आपल्या पित्याच्या इच्छे विरुद्ध मौसमी बरोबर लग्न करावयाचे असते.

या नंतर त्यांनी उस पार (बसु चटर्जी), दो झूठ स्वर्ग नरक या चित्रपटात मौसमीबरोबर नायक म्हणून काम केले. तो काळ मल्टीस्टार फिल्मचा होता. विनोद खन्ना, राजेश खन्ना, संजीव कुमार, धर्मेन्द्र, जीतेन्द्र, अमिताभ असताना विनोद मेहरा यांना जादा सिनेमे मिळाले नाहीत. त्यांनी दक्षिण भारतीय फिल्म डायरेक्टर्स कृष्णन पंजू, आर. कृष्णमूर्ति, एस. रामानाथन तथा दसारी नारायण राव बरोबर काम केले. विनोद मेहरा व रेखा याची जवळीक व रोमांस याची चर्चा बॉलीवुड खूप दिवस चालू होती. त्यांनी लग्न केल्याची चर्चा होती. खर खोटे काय ते विनोद व रेखा यांनाच माहीत. तसे यांनी विनोद मेहरा तीन लग्ने केली होती. मीना ब्रोका पहली पत्नी, बिंदिया गोस्वामी दुसरी, तिसरी किरण. विनोद मेहरा यांचे ३० ऑक्टोबर १९९० रोजी निधन झाले.



# बच्चू कडूंवर हत्येच्या कटाचा आरोप! अमरावतीत गुन्हा



■ अमरावती

**प्रहार** जनशक्ती पक्षाचे प्रमुख आणि माजी मंत्री बच्चू कडू यांच्यावर हत्येचा कट रचल्याच्या आरोपाखाली अमरावती ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अचलपूरचे भाजपा आमदार प्रवीण तायडे यांचे बंधू अभिजित तायडे यांच्या अपघाताचा बनाव करून ठार मारण्याचा कट रचल्याचा गंभीर आरोप करण्यात कडूंवर आला आहे.

तक्रारदार अभिजित दिवाकरराव तायडे (४०) यांनी याप्रकरणी पोलिसांत या प्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, बच्चू कडू आणि त्यांचे सहकारी शुभम उर्फ गोलू माहोरे यांनी मिळून त्यांची हत्या करण्याचा कट आखला होता. हा घातपात अपघात असल्याचे भासवून पार पाडण्याची योजना होती, असा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणातील महत्त्वाचा पुरावा म्हणून अभिजित तायडे यांनी कथित संभाषणाचे ऑडिओ रेकॉर्डिंग पोलिसांकडे पेन ड्राईव्हद्वारे सुपूर्द केले आहे. पोलिसांनी संबंधित पेन ड्राईव्ह जप्त करून फॉरेन्सिक तपासासाठी पाठवला आहे. अचलपूर विधानसभा मतदारसंघात बच्चू कडू आणि तायडे कुटुंब यांच्यातील राजकीय संघर्ष आहे.

# पनवेलहून अलिबागसाठी रात्री ८.३० नंतर एसटी बसच नाही

■ अलिबाग

**नवी** मुंबईतील पनवेलहून अलिबाग, रेवदंडा, मुरुड आणि वडखळ या भागात जाणाऱ्या प्रवाशांसाठी ८.३० नंतर एसटी बस उपलब्ध नसल्यामुळे या प्रवाशांची मोठी कुचंबणा होत आहे. या वेळेनंतर नियमित बस सेवा थांबत असल्याने प्रवाशांना इतर अनियमित गाड्यांवर अवलंबून राहावे लागते.

तसेच या प्रवाशांना खर्चिक असलेल्या खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. अलिबाग हा पर्यटन तालुका आहे. मुंबईपासून नजिक असल्याने पर्यटकांची अलिबागला पहिली पसंती असते. त्यामुळे अनेक पर्यटक हे अलिबागला येतात. या पर्यटकांना मुंबईला परतताना नाईलाजाने गर्दीत प्रवास करावा लागतो. अलिबागसह रेवदंडा, मुरुड आणि वडखळ ही लोकांच्या पसंतीची स्थळे याच परिसरात आहेत. परंतु त्याठिकाणी जाण्यासाठी पनवेलसारख्या मध्यवर्ती ठिकाणाहून रात्री एसटी बसच नाही. तरी या बसस्थानकातून रात्री ८.३० वाजल्यानंतरही काही एसटी बसेस सोडाव्यात, अशी मागणी केली जात आहे.

# वसईत कुत्र्यांचा धुमाकूळ चर्चमध्ये ८ जणांना चावला

**वसई**- वसई विरार शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढतच आहे. शुक्रवारी सकाळी नायगाव येथील चर्च मध्ये 'गुड फ्रायडे' निमित्त प्रार्थने साठी गेलेल्या भाविकांवर पिसाळलेल्या कुत्र्याने हल्ला चढवत ८ जणांना चावा घेऊन जखमी केले आहे.

नालासोपारा मध्ये एका चिमुकल्या मुलीला कुत्रा चावल्याने रेबीजमुळे मृत्यू झाला होता. त्यानंतर श्वानदंशाचा प्रश्न ऐरणीवर आला होता. काहीही उपाययोजना केल्या जात नसल्याने भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे.

# नितेश राणेची केंद्रीय मंत्र्यासोबत मच्छीमारांच्या प्रश्नावर चर्चा

■ मुंबई

**जागतिक** स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यामुळे तेल कंपन्यांनी घाऊक ग्राहकांसाठी (बल्क कन्स्युमर) डिझेलच्या दरात मोठी वाढ केली आहे. याचा थेट फटका राज्यातील मच्छीमारांना बसत असून राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंग उर्फ लल्लन सिंग यांच्याशी फोनवर चर्चा केली.

या चर्चेत महाराष्ट्रातील मच्छीमारांना वाढत्या डिझेल दरांमुळे होत असलेल्या आर्थिक नुकसानीबाबत राणे यांनी सविस्तर माहिती दिली. यावर लल्लन सिंग यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून या प्रश्नावर लवकरच सकारात्मक तोडगा काढण्यासाठी आवश्यक पावले उचलली जात असल्याचा विश्वास व्यक्त केला. नितेश राणे यांनी एक्सवर पोस्ट करत या चर्चेची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, केंद्रीय मंत्र्यांशी दूरध्वनीवर चर्चा करून महाराष्ट्रातील मच्छीमारांची समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिली. केंद्र सरकारकडून यावर सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे. वाढलेल्या डिझेल दरांचा सर्वाधिक फटका मच्छीमारांना बसत आहे.

# दक्षिण मुंबईतील 'नोबल टॉवर'मधील बेकायदा बांधकामांवर कोर्टचा हातोडा

■ मुंबई

## इमारतीतील फेरबदल पाडण्याचे आदेश

**दक्षिण** मुंबईतील झाकेरिया मशीद स्ट्रीटवरील 'नोबल टॉवर' इमारतीतील बेकायदा बांधकामांवर अखेर हातोडा पडणार आहे. इमारतीमध्ये करण्यात आलेली सर्व अनधिकृत बांधकामे तसेच फेरबदल सहा महिन्यांच्या आत पाडून इमारत मंजूर नकाशाप्रमाणे पूर्ववत करण्याचे स्पष्ट आदेश उच्च न्यायालयाने पालिकेला दिले आहेत. यावेळी खंडपिठाने मुंबई महापालिकेने ३१ जुलै २०२४ रोजी केलेल्या तपासणीत अनेक गंभीर उल्लंघन आढळून आल्याची गंभीर नोंद घेतली.

नदीम इशरत खान आणि इतरांनी नोबल टॉवर इमारतीतील बेकायदा बांधकामांविरोधात याचिका दाखल केली होती. विकासकाने मंजूर नकाशाच्या विरोधात जाऊन इमारतीत अनेक बदल केल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता. याचिकेवर न्यायमूर्ती मकरंद कर्णिक आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांतर्फे अॅड. पी. बी. शाह, अॅड. कावल्य शाह यांनी, तर पालिकेतर्फे अॅड. वैशाली उगले यांनी बाजू मांडली. सर्व बाजू विचारात घेत न्यायालयाने बेकायदा बांधकाम करणाऱ्यांना झटका दिला.

इमारतीच्या तळमजल्यावरील स्टॅक पार्किंग आणि मोकळ्या जागेचे रूपांतर गोदामात करण्यात आले होते. पहिल्या ते पाचव्या मजल्यावरील कार लिफ्ट आणि पार्किंगच्या जागेत प्रत्येकी ६ निवासी खोल्या बांधण्यात आल्या होत्या. तसेच ८ व्या, १५ व्या आणि २० व्या मजल्यावरील 'रिफ्यूज एरिया'मध्ये बेकायदा खोल्या बांधल्या होत्या.

# समाज माध्यमांवर भर द्या! राज ठाकरेंचे स्पष्ट आदेश

■ मुंबई

**महाराष्ट्र** नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुंबईत पक्षाच्या सर्व संपर्क अध्यक्षांची महत्त्वपूर्ण बैठक घेतली. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी समाज माध्यमांवर भर द्या. सामाजिक भांडवल वाढवणे आणि जिल्हास्तरावर नियोजनबद्ध काम करण्याचे आदेश यावेळी देण्यात आले.

बैठकीत जिल्ह्यातील विविध संस्था, कलाक्षेत्रातील व्यक्ती तसेच स्थानिक स्तरावर ओळख असलेल्या व्यक्तींना पक्षाशी जोडण्यावर भर देण्यात आला. वाढत्या सोशल मीडियाचा प्रभाव लक्षात घेता इन्फ्लुएन्सर्स नाही



पक्षाशी जोडून त्यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आणि पक्षविरोधी किंवा चुकीच्या वर्तनावर कारवाई करण्याचे आदेशही बैठकीत देण्यात आले.

नाराज मतदार, कोणत्याही पक्षाशी न जोडलेले सामाजिक गट यांना आपल्या बाजूला आकर्षित करण्यासाठी विशेष रणनीती आखण्याचे निर्देश देण्यात आले. प्रत्येक संपर्क अध्यक्षाने दर महिन्याला किमान तीन दिवस नियुक्त जिल्ह्यात जाऊन प्रत्यक्ष आढावा घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. १९ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या निमित्ताने शिवाजी पार्क येथे होणाऱ्या जाहीर सभेला राज्यभरातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आणि पक्षाची ताकद दाखवावी, असे आवाहनही राज ठाकरे यांनी केले.

# पालिकेच्या रस्ता खोदकामामुळे वीजपुरवठा महिनाभरापासून खंडित

■ मुंबई

**वाकोला** शिवाजी नगर पाईपलेन रस्त्याच्या सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामासाठी पालिकेने खोदकाम केल्यामुळे भूमिगत वीज जोडण्या खंडीत झाल्या आहेत. याचा फटका रस्त्यालगत असलेल्या वीजेच्या दिव्यांच्या खांबांना बसला आहे. यावरील दिवे गेल्या एक महिन्यापासून बंद आहेत. यामुळे संपूर्ण परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे.

येथील डांबरी रस्ता खोदून काँक्रिटीकरणाचे काम पालिकेने सुरू केले आहे. यासाठी जेसीबी मशिनच्या सहाय्याने रस्त्याचे खोदकाम करण्यात येत आहे. या दरम्यान, जमिनीतील वीज जोडण्यांचा वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे पाईपलेन ते टिचर्स कॉलनीपर्यंत असलेले पदपथावरील विजेचे दिवे बंद आहेत. परिणामी संपूर्ण रस्ता काळोखात बुडाला आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालक व स्थानिक नागरिकांना या रस्त्यावरून ये-जा करणे असुरक्षिततेचे वाटू लागले आहे. रस्त्याचे काम कधी पूर्ण होईल व वीज पुरवठा कधी पूर्ववत सुरू होईल. याचे उत्तर पालिका देईल का?

# वसई-विरार पालिकेची मालमत्ता करवसुली ४०० कोटींच्या पार

■ विरार

**वसई-विरार** महापालिकेने यंदा प्रथमच मालमत्ता कर वसुलीचा विक्रम केला असून ४०० कोटींपार वसुली करण्यात यश मिळवले आहे.

वसई-विरार महापालिकेने यंदा ८६० कोटी ४४ लाख कोटी वसुलीचे उद्दीष्ट ठेवले होते. मात्र आर्थिक वर्षांचे १० महिने संपल्यानंतरही केवळ २९५ कोटी २८ लाख एवढी म्हणजेच एकूण मागणीच्या ३४ टक्केच करवसुली झाली होती. त्यानंतर महापालिका प्रशासनाने अभय योजना, शास्ती माफी अशा विविध उपाययोजना राबविल्या होत्या. त्या प्रयत्नांना यश आले आणि ३१



मार्चपर्यंत ३९४ कोटी ९४ लाखाची रोख स्वरूपात करवसुली करण्यात आली. ३१ मार्च आणि त्यानंतरचे धनादेश देखील स्वीकारले आहेत. त्यामुळे यावर्षी मालमत्ता कर वसुली ४०० कोटींच्या पार गेल्याची माहिती पालिकेने दिली आहे.


गेल्यावर्षी देखील महानगरपालिकेने मार्च अखेरपर्यंत ३९३ कोटी रुपयांची करवसुली करून उच्चांक गाठला होता. डिसेंबरपूर्वी मालमत्ता कराचा भरणा करणाऱ्या करदात्यांना २ टक्के शास्ती लागत नाही त्यामुळे डिसेंबर महिन्यात सर्व प्रकारचे करदाते मालमत्ता कराचा भरणा करतात. परिणामी एकाच महिन्यात महापालिकेची जवळपास ४२ कोटी रुपयांची करवसुली झाली होती.

# खासदार राणेंचा वाढदिवस कुडाळमध्ये विविध कार्यक्रम

■ कुडाळ

**माजी** केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे खासदार नारायण राणे यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस शुक्रवार १० एप्रिल रोजी साजरा होत आहे. या सुवर्णमयी सोहळ्याचे औचित्य साधून कुडाळ भाजपाच्यावतीने विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. खासदार राणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुरुवारी ९ एप्रिल रोजी हळदीचे नेरूर येथील श्री देव जटाशंकर मंदिर येथे लघुरुद्र व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच १० एप्रिल रोजी नेरूर येथील श्री कलेश्वर मंदिर येथे अभिषेक करून वाढदिवसाच्या मुख्य कार्यक्रमांचा शुभारंभ होईल.

# नवाकाळ शब्दकोडे- १५६५



**आडवे शब्द –**

२. फुलातील रज:कण, मुलांचे एक नाव ४. मूर्ख, बेअक्कल ८. विकार, व्याधी, रोग १०. तपशीलवार उलगडून सांगणे ११. याग १२. उरग, साप १३. कठीण, बिकट १५. चोप १६. आयुष्य १८. वेळ, समय हिंदीत १९. समुद्र २०. कट्टा, पलीकडे २२. झुपकेदार शेपटीचा छोटासा चपळ प्राणी, चानी २३. विस्तव, अंगार २५. निधन २६. चिडचिड, रागाने केलेली बडबड २८. सिद्धता ३०. जिव्हा ३२. घेराव, वेढा ३३. धनवर्षावाचा योग ३६. तेजोहीन, निस्तेज, मलूल ४०. पाहुणचार, बडदास्त ४२. जादू, किमया ४४. मस्तक, माथा ४५. अळशी, याच्या बियांचे तेल काढतात ४७. तोंडदेखले, वरकरणी ४९. मुद्रा, चेहरामोहरा ५०. शेणसडा घालून जमीन सारखी करणे ५१. परस्पर ५३. मवाली, समाजकंटक ५४. घाबरट ५६. गाडीचे चक्र ५७. कलंक ५९. श्रीराम ६१. काहीही केले तरी नुकसान दाखवणारी एक म्हण- इकडे आड ××× ××× ६४. नजर, दृष्टिक्षेप ६६. प्राणी ६८. असंमती ७०. चिंचेची चव ७१. मोकळी हवा नसलेली जागा ७३. संवत, वर्ष ७५. उतारवयीन, वृद्ध, म्हातारा ७६. दासी ७८. आकाश ८०. विपुल ८१. स्मरणी ८३. भीड घालून, आग्रहपूर्वक ८५. दिवा ८८. चावट, अवाजवी ९०. संकट किंवा भीम, मारूतीचे शस्त्र ९२. ढग, मेघ ९३. निष्णात ९६. उष्ण ९८. छातीतली हाडे १००. मदत करणे १०१. सूर्य १०३. वालुकामय प्रदेश १०४. साखर १०५. पूर्ण, एकंदर

**उभे शब्द –**

१. नियंत्रण, अटकाव २. गोव्याची राजधानी, आजीची आई ३. गूढ, खोल ४. निरंतर, सतत ५. फोडातील द्रव, रोगप्रतिबंधक औषध ६. रावणाची बहीण ७. ज्ञात, ठाऊक ८. विहीर ९. उन्हाचा त्रास, तलखी १०. विमानांचे स्थानक १३. याप्रमाणे १४. सदन, गृह १७. वाकडा २०. मुकलेला, वंचित २१. पृथ्वी २३. साडी किंवा धोतर नेसताना घातलेली चुणी २४. कबूल २५. ढगांमुळे दाटून आलेला अंधार २७. उत्तर (हिंदी) २९. सूची, जंत्री ३१. विश्व, ऐश्वर्य, छिद्र ३२. द्विज, ब्राह्मण ३३. प्रत्येक घरी ३४. बेडकांचे ओरडणे ३५. व्याघ्र, मांजरीचा भाचा ३७. फिकीर ३८. शिजवलेली डाळ ३९. नियंत्रण ४१. ईर्ष्या, चुरस ४२. कथित भूतबाधा ४३. धाक ४४. शिवाजीमहाराजांची राजवट ४५. पालनपोषण, जतन, सांभाळ ४६. बैठक ४८. कौरवांचे शत्रू ५०. देवाला संकटात घालणे ५२. टोणगा ५५. अनाथ ५६. नोकरी ५८. गर्दी, धामधूम ६०. घरातच रमणारा ६२. गणपती ६३. सामूहिक आक्रंदन ६५. नीटनेटकेपणा ६७. अपशकुन ६८. अभिनेता ६९. आवड ७२. भाव, प्रत्येक ७४. मासलेवाईक ७५. वर्तुळ ७६. हनुमान ७७. जास्तीतजास्त ७९. अग्रभागी असलेला ८२. पूर्वी असा केशकलाप केवळ टक्कल झाकण्यासाठी वापरीत ८४. पेज ८५. केविलवाणा ८६. काटछाट ८७. युद्ध ८८. वेगळे होणे ८९. माळ ९१. दरवाजा ९२. वेळ दाखवणारे यंत्र ९४. एक अप्सरा, कुबेराची सून ९५. तळे, पोहण्याची जागा ९६. गणपती ९७. वारूणी ९९. रानरेडा १००. बाजार, मंडई १०२. विष्णूची पत्नी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५६४ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. शेंदाड शिपाई ७. शिखर ९. जात १०. बरड ११. वैजयंतीमाला १२. बहीण १४. फडके १५. सगा १७. ईश्वर १९. कायिक २१. ऱ्हास २२. कवाड २३. सर २४. शेंडी लावणे २६. तरुण २७. सारमेय ३०. भोंदू ३१. पसा ३२. हरण ३३. मध्य ३४. धसका ३६. गरज ३८. हजर ३९. रोग ४०. सनातनी ४२. लगत ४३. हजारो ४५. रूप ४७. दगा ४९. बोचरा ५०. विरळ ५१. परगाव ५३. दासबोध ५६. नगर ५८. क्षीण ५९. रसद ६०. गदा ६१. चपलाहार ६४. वशिला ६६. गोरिला ६७. देवकीनंदन ७१. वजन ७३. मठ्ठा ७४. सावकार ७५. लावण्यवती ७७. अर्थहीन ८०. काटकसर ८३. नरडे ८४. पोपटपंची ८७. पाश ८८. मन ८९. लवलेश ९१. गजमुख ९२. कात ९४. रजत ९६. खरडपट्टी ९७. रविवार ९९. लड्डू १००. पिस्तूल १०१. तारका

**उभे शब्द** : १. शेंडेफळ २. डबके ३. शिर ४. पाडस ५. संजय ६. सतीचे वाण ७. शिलाई ८. रबर ९. जाणकार १३. शिकस्त १६. गाऱ्हाणे १८. श्वशुर २०. विलाप २२. करुण २३. सय २४. शेंदूर २५. वसाहत २६. तर २७. साध्य २८. मेघनाद २९. फूस ३०. भोंगळ ३२. हर हर महादेव ३३. मगरूर ३४. धनी ३५. काढा ३७. जलचर ४१. तगादा ४२अ. गरा ४४. जाळ ४६. पगार ४८. जंबो ४९. बोगदा ५१. पण ५२. वसन ५४. सदाशिव ५५. धडा ५६. नग ५७. आपला ६१. चरितार्थ ६२. रवका ६३. दादला ६५. लाज ६८. कीर ६९. नवमी ७०. सावकाश ७२. नजर ७३. महानगर ७४. सान ७६. तीट ७७. अडेलतट्टू ७८. हीन लेखणे ७९. अपंग ८१. कमतरता ८२. सन ८५. परंपरा ८६. चीजवस्तू ८७. पाखर ९०. शर ९२. कावा ९३. द्वारका ९५. जल ९८. विघ्न

## स्वयं पुनर्विकासामुळे मराठी माणूस मुंबईतच राहणार

पान ८ वरून

रहिवाशी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ. दरेकर म्हणाले की, स्वयं पुनर्विकासाच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला मोठे घर मिळतेय. स्वयं पुनर्विकास म्हणजे फार मोठी टेक्नोलॉजी नाही. स्वयं पुनर्विकासात एकही रुपया खिशातून घालावा लागत नाही. शासनाच्या सर्व परवानग्या विनाविलंब मिळतात. कारण मुख्यमंत्र्यांनी तशा प्रकारचे शासनाचे निर्णय केले आहेत. विकासकाला एसआरए प्रकल्पात विक्रीसाठी टॉवर बांधायला मिळतो म्हणून त्याला प्रकल्प करायचा असतो. त्याला एसआरएच्या लोकांबाबत प्रेम नसते. एसआरएतून एफएसआय मिळतो त्यातून टॉवर तयार होतो यामध्ये विकासकाला कोणतीही रुची असते. क्वालिटीला विकासकाशी देणे घेणे नसते. आपल्याला आपले घर बनवायचे आहे. क्वालिटी उत्तम असली पाहिजे असा प्रत्येक सभासदांचा आग्रह असतो. स्वयं पुनर्विकासात सभासद हा शेवटपर्यंत मालक असतो. सर्व सूत्र, नियंत्रण हे तुमच्या हातात असते. चांगले दर्जेदार बांधकाम करू शकतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तीन वर्षाच्या आत प्रकल्प उभा राहिला पाहिजे असा स्वयं पुनर्विकासाचा कायदा आणि नियम सरकारने केला.

दरेकर पुढे म्हणाले की, मुंबईत आज स्वयं पुनर्विकासाचे १६०० प्रस्ताव आमच्याकडे आले आहेत. २१ सोसायट्या उभ्या राहिल्या असून सर्व इमारतीत अडीच ते तीन वर्षात लोकं राहायल गेली आहेत. स्वयं पुनर्विकासात क्लस्टर आले आहे. एकापेक्षा जास्त इमारती एकत्र आल्या तर त्यांचा क्लस्टर पुनर्विकास होऊ शकतो. मुंबई जिल्हा बँकेकडे प्रस्ताव दिल्यानंतर मुंबई जिल्हा बँक सर्व फिजिबलिटी रिपोर्ट बघून कर्ज मंजूर करते. त्यानंतर प्रोसेसने इमारतीचे काम टप्प्याटप्प्याने सुरू होते. भाड्याचे, प्रीमियमचे पैसे मिळतात. एकही रुपया सभासदांच्या खिशातून घालावा लागत नाही. आतापर्यंत बऱ्याचशा सोसायट्या झाल्या त्यांचा शंभर वर्षांचा मेंटेनन्सही फ्री झाला आहे. सर्व बाजूंनी स्वयं पुनर्विकासाचा फायदाच आहे. सर्वांनी विश्वासाने एकत्र या. ज्या खोल्या नावावर नाहीत त्या म्हाडाच्या माध्यमातून तुमच्या नावावर करून देऊ,

**कष्टकऱ्यांसाठी ही वसाहत उभारायची आहे**

दरेकर म्हणाले की, आज सुदैवाने सरकार आपले आहे. मी त्या सरकारमध्ये प्राधिकरणाचा अध्यक्ष आहे. स्वतः राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राजाश्रय या योजनेला आहे. तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार तसे तुम्ही स्वतःचे घर स्वतः निर्माण करणार आहात. कन्नमवार नगर, टागोर नगरमध्ये मी अनेक वेळा आलो आहे. या परिसराची मला माहिती आहे. येथे राहणारा माणूस कष्टकरी, मध्यमवर्गीय आहे. आंबेडकर चळवळीचे लोक मोठ्या प्रमाणावर येथे राहतात. म्हणून कष्टकऱ्यांसाठी ही वसाहत उभी करायची आहे. आपण सर्वजण मिळून ही योजना यशस्वी करू.

## ट्रम्प यांचा आणखी एक धक्का
## औषधांवर १०० टक्के टॅरिफ

पान १ वरून

हवी असल्यास किंमत कमी करण्याची किंवा अमेरिकेत उत्पादन सुरू करण्याची हमी द्यावी लागेल. औषधांप्रमाणेच अमेरिकेने औषधांसाठी लागणाऱ्या आणि अमेरिकेत आयात होणाऱ्या महत्वाच्या घटकांवरही निर्बंध लादले आहेत.

ट्रम्प यांनी शंभर टक्के आयात शुल्कामधून काही युरोपीय समुदाय, जपान, दक्षिण कोरिया आणि स्वित्झर्लंड यांना दिलासा दिला असून त्यांना १५ टक्के कमी म्हणजेच ८५ टक्के आयातशुल्क भरावे लागणार आहे. तर ब्रिटनला तीन वर्षांसाठी शुल्कमुक्त ठेवले आहे.जेनेरिक औषधांना यातून सध्या सवलत देण्यात आली असली तरी एक वर्षानंतर त्यावर विचार केला जाणार आहे. कदाचित जेनेरिक औषधांनाही शंभर टक्के आयात शुल्काच्या कक्षेत आणले जाण्याची शक्यता आहे.

ट्रम्प यांनी याआधी जगभरातील देशांवर लागू केलेल्या वाढीव आयातशुल्काचे जागतिक अर्थकारणावर गंभीर परिणाम दिसून आले होते. ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्हच्या (जीटीआरआय) अहवालानुसार ट्रम्प यांनी आता जाहीर केलेल्या औषधांवर शंभर टक्के आयात शुल्क लागू करण्याचा निर्णयाचे तत्काळ परिणाम जाणवणार नाहीत. मात्र भविष्यात शंभर टक्के आयात शुल्काच्या कक्षेत आणखी उद्योग आणले गेले तर ते जागतिक व्यापारासाठी धोकादायक ठरू शकते.

## एकनाथ शिंदेंचे खरातला १७ कॉल! चाकणकर १७७ वेळा बोलल्या

पान १ वरून

कॉलची माहिती नाही. इतके नॉर्मल कॉल झाले असतील, तर व्हॉट्सप कॉल किती असतील याची कल्पनाही

करता येत नाही. मी सीडीआरमध्ये पाहिले

की सर्वात जास्त वेळ कोण बोलले आहे, तर पहिले नाव तृप्ती खरात यांचे आहे. कुटुंबातील लोकांशी दुसऱ्या क्रमांकावर रुपाली चाकणकर आहेत. त्यांनी ३३,७२७ सेकंद खरातशी संभाषण केले आहे. त्यांची पूर्ण चौकशी करून त्यांच्यावर एफआयआर दाखल झाला पाहिजे आणि त्यांना अटक झाली पाहिजे. कारण एवढा वेळ गुरूसोबत कोणीही बोलत नाही. दीपक केसरकर यांच्या जवळचे दीपक लोंढे यांचे १८९ कॉल झाले आहेत. त्यांचे ३०,५७९ सेकंद संभाषण झाले आहे. खरातला देशातील जवळपास सर्व राज्यांतून फोन यायचे. त्याचबरोबर कतार, युएई, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, व्हर्जिन आयलंड, ओमान, ख्रिसमस आयलंड येथून कॉल आले आहेत.

यावर प्रतिक्रिया देताना मंत्री चंद्रकांत बावनकुळे म्हणाले की, एसआयटीचा तपास सुरू आहे. तो डायव्हर्ट होऊ नये, म्हणून अशा संवेदनशील प्रकरणावर भाष्य करणे योग्य नाही.

दरम्यान, आज एसआयटीने अशोक खरातची पत्नी कल्पना आणि मुलगा हर्षवर्धन याची एसआयटीकडून पुन्हा चौकशी झाली. खरातने शिर्डीत एका शेतकऱ्याची जमीन खरेदी प्रकरणी फसवणूक केली. यासंदर्भात ही चौकशी झाली. यावेळी कल्पनाच्या दोन भावांचीही चौकशी एसआयटीने केल्याची माहिती आहे. जमीन खरेदीच्या प्रकरणात त्यांचे कल्पनाशी आर्थिक व्यवहार झाल्याचे तपासादरम्यान उघड झाले आहे. मुलगा हर्षवर्धनने चौकशीदरम्यान बहुतांश प्रश्नांची उत्तरे देताना 'सर्व काही डॅडलाच माहिती आहे', असे सांगितले. कल्पना खरात अजूनही फरार असून तिचा शोध सुरू आहे. कल्पनाच्या माहेरच्या लोकांची माहिती आज उघड झाली. लग्नानंतर जवळपास १६ वर्षापासून कल्पना माहेरच्या नातेवाईकांशी संपर्कात नाही. तिला अशोक खरात हा कधीही आम्हाला भेटायला येऊ देत नव्हता, अशी माहिती नातेवाईकांनी दिली. आम्ही तुटपुंज्या शेतीवर उदरनिर्वाह करतो असेही त्यांनी सांगितले. खरात प्रकरणात आज ईशान्येश्वर मंदिराच्या शिवनिका संस्थानवरील तीन संचालकांचीही चौकशी करण्यात आली.

## बारामतीत काँग्रेस उमेदवार देणार
## संजय राऊत मात्र भूमिकेवर नाराज

पान १ वरून

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या माहितीला दुजोरा दिला आहे. बारामतीमध्ये सुनेत्रा पवार यांच्या विरोधात थेट उमेदवार उभा करण्याच्या काँग्रेसच्या भूमिकेवर उबाठा सहमत नाही.शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने बारामतीत उमेदवार देणार नाही,असे आधीच जाहीर केले आहे. मात्र काँग्रेसच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीत तणाव निर्माण झाला आहे. त्याशिवाय राहुरीतही काँग्रेसने उमेदवार देण्याऐवजी तिथे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची ताकद असल्याने समन्वयाने निर्णय घ्यावा,असे राऊत यांचे म्हणणे आहे.म्हणजे राहुरी हा सुध्दा मविआत तणावाचा मुद्दा आहे.

## हर्षवर्धन पाटलांच्या कन्येला संधी

पान १ वरून

काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ कमी ठेवून अधिकाधिक सदस्यांना संधी देण्याची मागणी केली होती. त्यानुसार हा निर्णय झाल्याचे स्पष्ट आहे. या निर्णयामुळे पुढील पाच वर्षात अधिकाधिक सदस्यांना पदाधिकारी होण्याची संधी मिळणार असून, पक्षांतर्गत समतोल राखण्याचा प्रयत्न असणार आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्यात अनेक वर्षांपासून वाद होता. १९९९, २००४, २००९ या कालावधीत इंदापूरचे आमदार राहिलेल्या हर्षवर्धन पाटलांच्या विरोधात २०१४ आणि २०१९ साली अजित पवारांनी दत्ता भरणे यांच्या पाठीमागे ताकद लावून पाटील यांचा पराभव केला. २०१९ मध्ये अजित पवारांनी इंदापुरात केलेले भाषण चांगलेच गाजले होते. ज्यात अजित पवार म्हणाले होते की, वाट्टेल ते झाले तरी इंदापुरची जागा राष्ट्रवादी सोडणार नाही. भले आघाडी नाही झाली तरी बेहत्तर. हा अजित पवारचा शब्द आहे. त्यानंतर आज त्यांच्या मुलीला सुनेत्रा पवार यांनी दिलेल्या संधीमुळे चर्चांना उधाण आले आहे.

## गोकुळ दूध संघात खळबळ ! महाडिक गटाला डावलले ?

■ कोल्हापूर

**कोल्हापूरातील** गोकुळ दूध महासंघाच्या आगामी निवडणुकीवरून राजकीय वातावरण तापले आहे. वाढीव सभासद, पात्र-अपात्र संस्थांची यादी आणि मतदार यादीतील घडामोडींमुळे निवडणूक प्रक्रिया पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली.

महाडिक गटाला निवडणूक प्रक्रियेतून डावलल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून कोल्हापुरातील सहकार राजकारणात नव्या संघर्षाची ठिणगी पडल्याचे मानले जात आहे.

गोकुळ दूध संघ हा कोल्हापूर जिल्ह्यातील अत्यंत प्रभावी सहकारी संस्था म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या निवडणुकीत प्रत्येक निर्णयाला राजकीय महत्त्व प्राप्त होत आहे.या सर्व प्रकरणावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री हसन मुश्रीफ यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, संस्थांची चौकशी ही नियमित प्रक्रिया आहे आणि काही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. त्यामुळे अंतिम निर्णय न्यायालयच देईल.

तसेच नियमबाह्य संस्था मतदानातून बाहेर जातील आणि पात्र संस्था मतदान करतील.दरम्यान,पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनीही या निवडणुकीवर भाष्य करताना महायुती म्हणूनच निवडणूक लढवली जाईल, असे स्पष्ट केले. पात्र-अपात्र संस्थांची अंतिम यादी आल्यानंतर पुढील रणनीती ठरवली जाईल. दरम्यान,वाढीव सभासद नोंदणी आणि कथित बोगस संस्थांबाबत दाखल झालेल्या तक्रारींमागे महाडिक गटाचा प्रभाव असल्याचीही चर्चा आहे.

## अंजनगाव शिवपुतळा वादात जरांगे- हाके आमनेसामने

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यातील माढा तालुक्यातील अंजनगाव खेलोबा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावरून मराठा-धनगर या दोन गटांतील वादावर आजही तोडगा निघाला नाही. या वादामुळे या परिसरात तणावपूर्ण वातावरण होते. दोन्ही समाजांमध्ये समन्वय साधण्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी प्रयत्न केला. दरम्यान या वादात ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलक जरांगे आमनेसामने आले आहेत. या वादात हाके यांनी धनगर समाजाची बाजू घेतल्याने मराठा समाजाने नाराजी व्यक्त केली.

आज या परिसरात पोलिसांकडून बॅरिकेट्स लावले होते. २ गट आमनेसामने होते. पुतळा शासकीय जागेत स्थलांतरीत होईपर्यत ठिय्या देणार असल्याची हाक लक्ष्मण हाके यांनी दिल्यानंतर खळबळ उडाली.मराठा समाजाच्या गटाकडून हाके यांना गावातून हाकला अशा घोषणा सुरू झाल्यानंतर वाद पेटला. पोलिसांनी बाहेरून गावातील लोकांना गावात येऊ देऊ नये अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली. दोन्ही बाजूंनी जोरदार घोषणा देण्यात आल्या. कालचा अनुभव लक्षात घेता आज मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात होता. आंदोलन स्थळावरून उठून लक्ष्मण हाके बॅरिगेटिंगच्या दिशेने धावल्यावर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आंदोलकांची समजूत घातली. पुतळ्याचा वाद वाढल्यानंतर मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांनी न्यायालयात जाण्याचे ठरवले. त्यांची मराठा गटासोबत बैठक पडली आहे. मोजणी करुन जर गट नंबर ८१४ देवस्थानच्या ४५ गुंठे क्षेत्राच्या जागेतजर पुतळा येत असेल तर पुतळा काढून घेण्याला मराठा गटाने संमती दिली.

**NOTICE**

**Is** hereby given that the Certificate (s) for Suhasini Sharad Potdar bearing Equity Share certificates No(s) **60623 & 60099 Nos. 32293987-32294026, 32272542-32272581** respectivly, under the folio No-**06986846 & 06951724** of and the Distinctive (s) of UltraTech Cement Limited standing in name Suhasini Sharad Potdar has/have been lost or mislaid and the undersigned has/ have applied to the Company to issue duplicate Certificate(s) for the said shares. Any person who has any claim in respect of the said shares should write to our Registrar, KFin Technologies Limited. Selenium Tower B, Plot 31-32, Gachibowli, Financial District, Hyderabad-500032 within one month from this date else the company will proceed to issue duplicate Certificate(s).

**Sd/-**
**Suhasini Sharad Potdar**

**जाहीर नोटीस**

या जाहिरातीद्वारे असे सूचित करण्यात येते की न्यू आम्रपाली सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, बि.क्र.के – ८/११४, एम.एम.आर. डी.ए. वसाहत कांजूरमार्ग (प.), मुंबई– ४०० ०७८. या खोलीचे मूळमालक नवरंगी विश्वनाथ राजभर यांनी आपली खोली अलका शिवाजी कांबळे यांना १४/०८/२०१३ रोजी विक्री केली आहे तरी आता खोली नावावर करायचे असल्याने त्यांचा आम्ही त्यांची शोध घेत आहोत. तरी या घरचे मालक नवरंगी विश्वनाथ राजभर स्वतः किंवा यांचे वारस ही जाहिरात प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत रूम नंबर ११४ मध्ये येऊन संपर्क साधावे.

सही/–
अलका शिवाजी कांबळे
(जाहिरातदार)

वादी तर्फे वकील श्री. अश्वीन शाहू भोसले

**जाहीर समन्स**

**खेड येथील मे. दिवाणी न्यायाधीश, व स्तर खेड येथील श्री गोकले सो., यांचे न्यायालयात मुक्काम-खेड,**

नियमित दिवाणी दावा नं. १२७/२०२५
निशाणी क्र. ८५

**रामचंद्र लक्ष्मण मर्चंडे वगैरे ८** ... वादी
विरुद्ध,
**अशोक देवजी उर्फ देवक्या मर्चंडे वगैरे १९** ... प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी क्रमांक ४ राजेंद्र भागुराम मर्चंडे
प्रतिवादी क्रमांक ६ संजना भागुराम मर्चंडे
प्रतिवादी क्रमांक १३ शिवाजी गंगाराम मर्चंडे
प्रतिवादी क्रमांक १७ सुमन यशवंत उर्फ येशा मर्चंडे
प्रतिवादी क्रमांक १८ वच्छला यशवंत उर्फ येशा मर्चंडे

ज्याअर्थी रामचंद्र लक्ष्मण मर्चंडे वगैरे ८ यांनी खेड येथील मे. दिवाणी न्यायालय व. स्तर, खेड यांचे कोर्टात नियमित दिवाणी दावा क्रमांक १२७/२०२५ हा दावा दावा मिळकती संदर्भात दाखल केलेला आहे. सदरचे वर नमुद प्र.वादी क्र. ४ हे रा.प्रणित अपार्टमेंट, रुम नं. १०३, तुळशी निवासच्या बाजूला नागवाडी, दिवा, ठाणे पश्चिम ४००६१२, प्र.वादी क्र.६ हे प्रणित अपार्टमेंट, रुम नं. १०३, तुळशी निवासच्या बाजूला, नागवाडी, दिवा, ठाणे पश्चिम ४००६१२. प्र.वादी क्र. १३ हे राहणार नारायण ब्रम्हा चाळ, बी विंग, रुम नं. १०२, गांधी चौक, फुलपाडा रोड, विरार पूर्व, जि. पालघर ४१०३०५, प्र.वादी क्र. १७, हे रा. नेहरुनगर, साई बाबा चौक, हनुमान चाळ, रुम नं. २८४, महाकाली चाळीच्या बाजूला, विलेपार्ले, पश्चिम मुंबई ४०००५६ आणि प्र.वादी क्र. १८ हे रा. ए/१३/४१ सिध्दार्थ नगर, वरळी, टेकडी, वरळी, मुंबई ४०००१८ येथे राहणारे असल्या कारणाने त्यांच्या पत्यावर समन्स काढण्यात आलेले होते व आहेत. परंतु वर नमुद सर्व प्र.वादी क्र. ४,६,१३,१७ आणि १८ यांना याकामी मे. कोर्टाचे बेलिफामार्फत तसेच आरपीएडी मार्फत बजावणी करण्याकरीता समन्स पाठविले असता सदर पत्यावर वर नमुद सर्व प्रतिवादी यांना बजावणी झालेली नाही. वादी यांना माहित असलेला शेवटचा पत्ता हाच आहे. सबब, वादी हे मे. कोर्टाच्या पूर्व परवानगीने प्र.वादी क्र. ४,६,१३,१७ आणि १८ यांना बजावणीसाठी हे जाहीर समन्स प्रसिद्ध करणेकामी अर्ज केला आहे.

त्याअर्थी वर नमुद प्रतिवादी कमांक ४,६,१३,१७ आणि १८ यांना असे कळविण्यात येते की, नियमित दिवाणी दावा कमांक १२७/२०२५ मध्ये पुढील नेमली दि. ०८/०५/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता उपस्थित राहून आपले म्हणणे नोंदवावे. त्यादिवशी तुम्ही स्वःता अगर तुमचे कायदेशीर प्रतिनिधी मार्फत वर नमुद न्यायालयात हजर रहावे. त्यात कसूर केल्यास किंवा तुम्ही गैरहजर राहिल्यास तुमचे विरुद्ध मा कोर्ट योग्य तो पुढील आदेश पारित करणेत येईल व तुम्हाला नियमित दिवाणी दावा क्रमांक **१२७/२०२५**ची कायदेशीर बजावणी झालेली आहे असे समजून मे. कोर्ट योग्य ते आदेश पारित करील, याची योग्य दखल ण्यात यावी.

आज तारीख ३१ /०३ /२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
तयार करणार,

सही/-
(ओ.एस. तोडणकर)
क लिपिक,
दिवाणी न्यायालय व स्तर, खेड

शिक्का

सही/-
(श्री. डि. अेन. कांबळे)
अधीक्षक,
दिवाणी न्यायालय. व. स्तर,खेड.

## एका पुलाच्या बदल्यात इराण आठ पूल पाडणार



**तेहरान** - इराणवरील हल्ले अधिक तीव्र करण्याच्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेनंतर अमेरिकेने इराणच्या कराज शहराजवळचा बी-१ या अत्यंत महत्त्वाच्या पुलावर क्षेपणास्त्र डागले. या हल्ल्यात पुलाचे जबर नुकसान झाले. आता त्याचा बदला घेण्यासाठी इराण सज्ज झाला असून आपला एक पूल पाडण्याच्या बदल्यात आखाती देशांमधील आठ पुलांवर क्षेपणास्त्र डागण्याची धमकी इराणने दिली आहे. या आठ पुलांची नावे असलेली हिटलिस्ट इराणने जारी केली आहे. इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्डशी (आयआरजीसी) संबंधित असलेल्या फार्स न्यूज एजन्सीने हे वृत्त दिले आहे. हे युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिकेने बी-१ पुलाच्या रुपाने पहिल्यांदाच इराणच्या नागरी प्रकल्पावर भीषण हल्ला केला.

# आयजीच्या जीवावर बायजीची चैन कशासाठी?

**'उडान'अंतर्गत ३२७ मार्गांवर विमानसेवा बंद !' ही बातमी वाचली असेल त्यांच्यासाठी आणि वाचली नाही त्यांच्यासाठीही. केंद्र सरकारचा देशातील अशा प्रकारचा 'उडान' हा काही पहिला कार्यक्रम किंवा योजना नाही, तर या योजनेची मुळे इंदिरा गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात १९८१ साली जी वायुदूत सेवा भारतात सुरू करण्यात आली होती; तीत आहेत. वायुदूत ही कंपनी तत्कालीन एअर इंडिया आणि इंडियन एअरलाइन्स यांची संयुक्त कंपनी होती, म्हणजेच वायुदूत सरकारी कंपनी होती.**

**वायुदूत** सेवेचा उद्देश देशातील दुर्गम भागातील शहरं आणि लहान शहरांना हवाईमार्गांनी जोडणे हाच होता. त्या काळात वायुदूत सेवेची खूप 'खिल्ली' उडविण्यात आली होती. सदर सेवा आर्थिक अडचणींमुळे १९९७ साली बंद करण्यात आली. सरकारी कंपनी असलेल्या वायुदूत ने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्यांच्या तिकिटावर सूट दिली जात होती की नाही हे



ठाऊक नाही, पण दूरदृष्टीचे पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नाविन्यपूर्ण योजनांना तेंव्हा वर्तमान सरकारी पक्षातील अनेकांनी आणि डाव्यांनी तीव्र विरोध केला होता.आता त्याच वायुदूतचं वर्तमानातील 'मॉडेल म्हणजे उडान होय!'

शाहू पाटोळे

वायुदूत ही कंपनी सरकारी असल्याने अर्थातच तिच्यावर सरकारचे नियंत्रण होते. आता देशभरात सरकारी मालकीची विमानसेवा देणारी एकही कंपनी नाही. आता काळ बदलला आहे, मध्यमवर्गाची क्रयशक्ती वाढलेली आहे.आता भारतातही विमानप्रवास ही चैन राहिलेली नसून, समाजातील बऱ्याच घटकांची ती गरज झालेली आहे. त्या 'विमानसेवेच्या गरजवंतांसाठी' विमानसेवा उपलब्ध करून द्यावी म्हणून खाजगी कंपन्यांना सांगणे आणि पायाभूत सेवा उपलब्ध करून देणे हे सरकारचे काम आहे; इथवर ठीक आहे. पण विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी खाजगी मालकीच्या विमान कंपन्यांना या पूर्वी अनुदान दिले आणि आता पुन्हा अनुदान देण्यासाठी सुधारीत उडान

योजनेसाठी सरकारने २८,८४० कोटी रुपयांचा निधी राखीव केला आहे. सरकारने हा जो निधी राखीव केला आहे, तो सर्वसामान्य जनतेच्या करातून गोळा केलेला आहे; अशा करोडो लोकांच्या की जे रेल्वेने जनरल बोगीतून (म्हणे, दीनदयालु कोच) आणि लालपरीसारख्या बसगाड्यांमधून जीवमुठीत घेऊन प्रवास करतात, ज्यांचा विमान प्रवासाशी कसलाही संबंध नाही. विमान कंपन्यांना आणि अर्थातच विमानाने प्रवास करणाऱ्यांचा आर्थिक बोजा सर्वसामान्य लोकांच्या खिशातून का द्यायचा? अनुदानाची तीन वर्षांची मुदत संपताच खाजगी विमान कंपन्यांनी ६६३ पैकी ३२७ मार्गांवरील सेवा बंद केली असेल तर पाच वर्षांनंतर ही अनुदान योजना बंद झाल्यावर त्याच कंपन्या कशावरून त्या मार्गांवरील वाहतूक बंद करणार नाहीत? जनतेने मागणी न करता स्वतःहून विकास लादणारे हे सरकार कुणाच्या तरी स्वप्नासाठी वंदे भारतसारख्या महागड्या रिकाम्या रेल्वेगाड्या पळवून नियमित चालणाऱ्या अन्य रेल्वेगाड्यांचा खोळंबा करतेय. वंदे भारत रेल्वेगाड्या म्हणजे जमिनीवर धावणारी तोट्यातील विमानंच आहेत; फक्त ती सरकारी असल्याने तोटा दाखवता येत नाही. ज्यांना ज्या परवडणाऱ्या साधनांनी प्रवास करायचा आहे, त्याने ते करतील, सरकारने पायाभूत सुविधा द्याव्यात, न मागता खाजगी विमान कंपन्यांना अनुदान देण्याची उठाठेव का केली जातेय?

## लवकरच नगरसेवकांच्या वाहनांवर 'क्युआर कोड'

■ मुंबई

**आधुनिक** तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात नेहमीच अग्रेसर राहिलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेने आता सर्व नगरसेवकांच्या वाहनांवर क्युआर कोड असलेले स्टिकर लावण्याचा निर्णय घेतला आहे. नगरसेवकाच्या वाहनावरील क्युआर कोड आपल्या मोबाईलच्या साह्याने स्कॅन केल्यानंतर त्या नगरसेवकाचे पूर्ण नाव, तो ज्या प्रभागाचे प्रतिनिधित्व करतो त्या प्रभागाचा क्रमांक, नगरसेवकाचा पत्ता आणि त्याच्या वाहनाचा क्रमांक अशी सर्व माहिती नागरिकांना मिळू शकणार आहे. यासंदर्भात पालिकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, प्रशासन दरवेळी सर्व नगरसेवकांना ओळखपत्र, बॅच आणि पालिकेचा लोगो असलेले स्टिकर्स देते. सध्याच्या डिजिटल युगात आपणही नव्याचा स्वीकार करावा म्हणून हे क्युआर कोड असलेले स्टिकर्स सर्व नगरसेवकांना देण्यात येणार आहेत. या स्टिकर्सवर 'नगरसेवक' असे ठळक अक्षरात लिहिलेले असेल.

## मेरी खामोशी को मेरी हार मत समझना कारवाईनंतर चड्ढांचा 'आप'ला इशारा

■ नवी दिल्ली

**राज्यसभेत** वेगवेगळ्या मुद्द्यांवर परखडपणे भूमिका मांडणारे राघव चड्ढा यांची आम आदमी पक्षाने उपनेतेपदावरून उचलबांगडी केल्यानंतर आज खा. राघव चड्ढा यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ संदेश पोस्ट केला. या व्हिडिओमध्ये त्यांनी आपल्यावरील कारवाईबद्दल आम आदमी पक्षाला जाब तर विचारलाच, पण त्याबरोबर पक्षाला सूचक इशारादेखील दिला की, मी शांत झालोय, पराभूत नाही.

खा. राघव चड्ढांनी पोस्टमध्ये लिहिले आहे की, मला जेव्हा संसदेत बोलण्याची



संधी मिळाली तेव्हा मी जनतेच्या मुद्द्यावर बोललो. कदाचित अशा विषयांवर बोलतो जे विषय सामान्यतः संसदेत चर्चिले जात नाहीत. परंतु जनतेच्या प्रश्नावर बोलणे हा गुन्हा आहे का? मी एखादा गुन्हा केला की चूक केली? हा प्रश्न मी यासाठी विचारत आहे. कारण आम आदमी पक्षाने संसदेच्या

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

सचिवांना सांगितले आहे की, राघव चड्ढा यांना संसदेत बोलण्यापासून थांबवा. माझ्या बोलण्यावर का कोणी नियंत्रण आणेल? मी जेव्हा बोलतो तेव्हा जनतेच्या प्रश्नाबाबत बोलतो.

## भारताची इंधनाची गरज भागवू

■ नवी दिल्ली

**इंधन** तुटवड्याच्या सध्याच्या काळात जुना मित्र देश असलेल्या रशियाने भारताला केला जाणारा तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा वाढवून भारताची इंधनाची गरज भागवण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे इंधन टंचाई आणि दरवाढीचा सामना करत असलेल्या भारतीयांना दिलासा मिळाला आहे.

रशियाचे उपपंतप्रधान डेनिस मांतुरोव्ह यांनी काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी भारताला तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा वाढवण्याचा प्रस्ताव दिला. त्याचबरोबर रासायनिक खतांचा पुरवठा वाढवण्यावरही या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. पंतप्रधान मोदी यांनी याबाबत एक्स पोस्टच्या माध्यमातून माहिती दिली. रशियाच्या उपपंतप्रधानांसोबत

**रशियाची ग्वाही**

द्विपक्षीय व्यापार, खते आणि कनेक्टिव्हिटी वाढवण्यासंदर्भात चर्चा झाली. गेल्या डिसेंबरमध्ये राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांच्या भारत दौऱ्यादरम्यान झालेल्या भारत-रशिया शिखर परिषदेच्या निष्कर्षांची अंमलबजावणी करण्यासाठी दोन्ही देशांचे सुरू असलेले सातत्यपूर्ण प्रयत्न कौतुकास्पद आहेत, असे मोदींनी पोस्टमध्ये लिहिले.

## यापुढे शाळांच्या नावांत ग्लोबल इंटरनॅशनल, युरो शब्दांना बंदी

■ मुंबई

**यापुढे** राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने राज्य मंडळ, सीबीएसई किंवा आंतरदेशीय मंडळांशी संलग्न असलेल्या शैक्षणिक संस्थांना शाळांच्या नावांमध्ये इंटरनॅशनल, ग्लोबल, युनिव्हर्सल, वर्ल्ड, युरो अशी नावे वापरण्यास मनाई केली आहे. असे शब्द वापरुन या 'इंटरनॅशनल' शाळा असल्याचे भासवून पालकांची दिशाभूल करत असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

**राज्य शालेय शिक्षण विभागाचा निर्णय**

स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव पाठवताना शाळेच्या नावात पालक आणि विद्यार्थ्यांची अशी दिशाभूल करणारे शब्द वापरत असल्याचे शिक्षण विभागाच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये नावावरून निर्माण होणारा संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. आता आय.बी. केंब्रिज, आय.जी.सी. एस अशा आंतरराष्ट्रीय मंडळांशी संलग्न असलेल्या किंवा या मंडळांशी संलग्न होण्यास इच्छुक असलेल्या शाळांनाच केवळ या शब्दांचा वापर करता येईल, असे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला, परंतु हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणार नाही. यापुढे नव्याने स्थापन होणाऱ्या शाळांनाच हा निर्णय लागू राहील.

## जेडीयु आमदारांचा भाजपा मुख्यमंत्र्याला नकार! निशांत कुमार यांना पाठिंबा

■ पाटणा

**बिहारच्या** राजकारणात मोठी खळबळ उडवणाऱ्या घडामोडीत, जनता दल (जेडीयु) च्या आमदारांनी भाजपा मुख्यमंत्रिपदाच्या पर्यायाला स्पष्ट नकार दिला. त्यांनी निशांत कुमार यांना पाठिंबा दर्शवला आहे. या भूमिकेमुळे राज्यातील सत्तासमीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

सर्वेक्षणानुसार, जेडीयुच्या ८५ पैकी ७० आमदारांशी संपर्क साधण्यात आला. यामध्ये तब्बल ९७ टक्के आमदारांनी भाजपाकडून मुख्यमंत्री नको, अशी ठाम भूमिका घेतली. बिहारचे विद्यमान मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या जागी भाजपाचा चेहरा पुढे येण्यास त्यांनी विरोध दर्शवला आहे. याउलट, बहुसंख्य आमदारांनी निशांत कुमार यांना मुख्यमंत्रिपदासाठी पसंती दिली आहे. गेली दोन दशके मुख्यमंत्रिपद जेडीयुकडे असून, पुढेही तेच राहावे, असा आमदारांचा एकमुखी सूर आहे. अनेक आमदारांनी स्पष्ट केले की, पुढील मुख्यमंत्री कोण होणार याचा अंतिम निर्णय नितीशकुमारच घेतील व तो सर्वांना मान्य असेल.

## टीव्हीएस कंपनीत कौटुंबिक वाद वेणू पिता-पुत्री यांच्यात मतभेद

■ नवी दिल्ली

**टीव्हीएस** समूहात कौटुंबिक वाद निर्माण झाला असून सुंदरम क्लेटन या होल्डिंग कंपनीच्या संचालक मंडळापर्यंत पोहोचला आहे. कंपनीचे चेअरमन वेणू श्रीनिवासन आणि त्यांची मुलगी तसेच व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मी वेणू यांच्यातील मतभेद अलीकडील संचालक मंडळातील घडामोडींनंतर स्पष्टपणे उघड झाले आहेत. संचालक मंडळाच्या अलीकडील बैठका गदारोळात



पार पडल्या असून, एका कंपनी सचिवांना वादग्रस्तपणे पदावरून हटवून नंतर पुन्हा पदावर रुजू करण्याच्या प्रकाराने या बैठका गाजल्या आहेत. या बदलांच्या पार्श्वभूमीवर, अध्यक्ष वेणू श्रीनिवासन यांनी पुन्हा सूत्रे हाती घेतली आहेत, तर दुसरीकडे त्यांची मुलगी लक्ष्मी वेणू यांच्या नेतृत्वासंबंधीच्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. टीव्हीएसच्या संचालकांची अवघ्या तीन दिवसांत दोनदा बैठक झाली. पहिल्या बैठकीत कंपनी सचिव पीडी देव किशन यांचा राजीनामा स्वीकारण्यात आला. मात्र पुढील बैठकीत हा निर्णय मागे घेण्यात आला. कंपनीतील या अधिकाऱ्याला हटवण्याचा निर्णय लक्ष्मी वेणू यांनी घेतल्याचे सांगितले जाते. कंपनी सचिवाचा समूहस्तरीय सेवांशी असलेला संबंध लक्षात घेता समन्वयाबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली होती.

## टाइल्स, सॅनिटरी वेअर उद्योगाला गॅसटंचाईचा फटका! प्रकल्प रखडणार

■ मुंबई

**आखाती** युद्धाचा भारताच्या रिअल इस्टेट क्षेत्रावर परिणाम दिसू लागला आहे. या युद्धामुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईचा टाइल्स आणि सॅनिटरी वेअर पुरवठ्याला फटका बसला आहे. महत्त्वाच्या फिनिशिंग मटेरियलच्या तुटवड्यामुळे चिंता वाढली असून पुरवठा साखळीतील अडथळे आणि वाढता खर्च यामुळे प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब होत असल्याची तक्रार विकासकांकडून केली जात आहे.यामुळे विशेषतः अंतिम टप्प्यातील प्रकल्पांच्या ताबा देण्याच्या वेळापत्रकात विलंब होण्याची शक्यता आहे.

क्रेडाईचे मुख्य कार्यकारी अधिकारी केवल वालांभिया यांनी सांगितले की, युद्धामुळे पुरवठ्यावर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. गॅस आणि एलपीजीच्या टंचाईमुळे ऊर्जा-आधारित उत्पादनांवर परिणाम झाला आहे. विशेषतः मोरबी येथून होणाऱ्या टाइल्सच्या पुरवठ्याला फटका बसला आहे. हा पुरवठा बाजारातील ८० टक्के गरज भागवतो. मर्यादित उपलब्धतेमुळे वितरकांनी किमती वाढवल्या आहेत, मात्र सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. मात्र संघर्ष सुरू राहिल्यास लोकांना प्रकल्पांचा ताबा मिळवण्यास २ ते ३ महिने विलंब लागू शकतो. विले पार्ले मार्बल असोसिएशनचे अध्यक्ष गजेंद्र भंडारी म्हणाले की, सुमारे ८० टक्के कारखाने बंद पडले आहेत. मोठ्या कंपन्या आता पूर्ण आगाऊ रक्कम मागत असून पूर्व खात्रीशिवाय नवीन ऑर्डर स्वीकारत नाहीत. निला स्पेसेसचे सीईओ दीप वडोदरिया यांनी सांगितले की, या युद्धामुळे अनेक स्तरांवर प्रकल्पांवर परिणाम होत आहे.

## स्वयं पुनर्विकासामुळे मराठी माणूस मुंबईतच राहणार
### विक्रोळीतील मार्गदर्शन शिबिरात आ. प्रवीण दरेकर यांना विश्वास

■ मुंबई

**मुंबईतील** मध्यमवर्गीय मराठी माणूस जो वसई, विरार, नालासोपाऱ्याला जाणार होता, तो आता स्वयं पुनर्विकासाच्या माध्यमातून मुंबईतच राहणार आहे, असा विश्वास मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केला.




ते विक्रोळी (पूर्व) टागोर नगर ग्रुप १ येथील करुणा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीतर्फे गुरुवारी आयोजित केलेल्या स्वयं पुनर्विकासावरील मार्गदर्शन शिबिरात बोलत होते.

याप्रसंगी मुंबई जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, संचालक आ. सुनील राऊत, माजी नगरसेवक चंद्रकांत निर्भावणे, विनायक शेजवळ, चंद्रकांत जाधव, रोशनलाल जैन, संजय सावंत, प्रदीप पगारे, सिद्धार्थ चंदनशिवे, पराग जाधव, सुहास बनसोडे, संदेश धोंदे, किशोर पवार यांसह मोठ्या संख्येने करुणा को-ऑप. सोसायटीतील » पान ७ वर







एकाधिकारशाहीविरोधात जनक्षोभ




आरबीआयची कसोटी



नक्षलवादमुक्तीची नवी पहाट

## गॅस टंचाईमुळे 'बेस्ट'ची उपाहारगृहे बंद पडू लागली



■ मुंबई

**आखाती** देशांतील युद्ध परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे मुंबईतील बेस्ट उपक्रमाची अनेक उपहारगृहे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, यामुळे कर्मचाऱ्यांच्या भोजनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी यावर वेळीच उपाययोजना करून कंत्राटदारांना तांत्रिक सवलत देऊन सेवा पूर्ववत सुरू करावी अशी मागणी 'बेस्ट' वर्कर्स युनियनचे सरचिटणीस शशांक राव यांनी बेस्टचे महाव्यवस्थापक यांच्याकडे केली आहे.

शशांक राव यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, बेस्टचे चालक, वाहक आणि कार्यशाळा कर्मचारी तसेच हजारो कर्मचारी अहोरात्र मुंबईची सेवा बजावत असतात. या कर्मचाऱ्यांना सकस आणि वेळेवर आहार मिळण्यासाठी ही उपाहारगृहे हा मुख्य आधार आहेत.

**वेळीच उपाययोजना करा! शशांक राव यांची मागणी**

परंतु गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे अनेक उपहारगृहे बंद होण्याच्या मार्गावर आहेत. जर ही उपाहारगृहे पूर्णपणे बंद झाली, तर कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊन त्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर आणि पर्यायाने उपक्रमाच्या कार्यक्षमतेवर होऊ शकतो.

## इंद्रायणी पाठोपाठ पवना नदी फेसाळली

■ पुणे

**आळंदीतील** इंद्रायणी नदी पाठोपाठ आता पिंपरी-चिंचवडमधून वाहणारी पवना नदीदेखील रसायन मिश्रित आणि मैला मिश्रित पाण्यामुळे फेसाळली आहे. चिंचवड केजुबाई बंधाऱ्यावर पवना नदीत पात्रात पांढरा फेस मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहे. नदीकाठच्या उद्योगांनी प्रक्रिया न केलेले रसायनमिश्रित पाणी थेट नदीत सोडल्यामुळे फेस तयार होत असल्याचा संशय आहे. शिवाय घरगुती वापराच्या डिटर्जंटचे प्रमाण वाढल्याने आणि त्यावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात पूर्ण प्रक्रिया न झाल्याने फेस तयार होत असल्याचेही सांगितले जाते. पिंपरी-चिंचवडकरांना याच नदीतून पाणीपुरवठा केला जातो, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## फलटण महिला डॉक्टर आत्महत्या निलंबित उपनिरीक्षक बदनेला जामीन

■ सातारा

**सातारा** जिल्ह्यातील फलटण येथे २३ ऑक्टोबर २०२५ रोजी डॉक्टर संपदा मुंडे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या प्रकरणात अटकेत असलेल्या निलंबित पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याला मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचकडून दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने त्याला ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे.



मूळची बीड येथील असलेली डॉ. संपदा मुंडे फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत होत्या. त्या प्रशांत बनकर यांच्या घरी भाड्याने राहत होत्या. काही कारणास्तव घरमालक बनकर आणि डॉक्टर यांच्यात वाद झाला होता. त्यानंतर त्यांच्या घराला कुलूप लावून डॉ.मुंडे यांनी मधुदीप हॉटेलमध्ये दोन दिवसांसाठी खोली घेतली होती. या काळात त्यांनी मदतीसाठी प्रशांत बनकर आणि पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने यांच्याशी संपर्क साधला होता.